गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

»मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

»पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

»नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

»वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | » शनिवार, ३० ऑगस्ट २०२५ | » वर्ष: १ » अंक:८८ | » पाने-८ | » किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## मराठवाड्यात ढगफुटी सदृश्य पाऊस

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. विशेषत: मराठवाड्यात पावसानं धुमाकूळ घातला आहे. नांदेड आणि बीड जिल्ह्यात मोठा पाऊस झाला आहे. नांदेड तालुक्यातील सोमेश्वर रहाटी जैतापूर परिसरात दोन दिवसापासून मुसळधार पाऊस सुरु आहे. आज पहाटे ढगफुटी झाल्यानं नांदेडकडे जाणारा राहाटी पुलावरुन पाणी वाहत होते. त्यामुळं नांदेड ते सोमेश्वर जैतापूर रहाटी या गावाचा संपर्क तुटला आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रशासन योग्य रितीने सर्व परिस्थिती हाताळत आहे. सर्व काही नांदेडमध्ये केलं जात आहे. राज्य सरकार सर्वोतपरी मदत करेल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. नांदेडमध्ये मोठा पाऊस झाला आहे. मी तेथील प्रशासनाच्या संपर्कात असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. वरील धरणातून पाणी मोठ्या प्रमाणात सुटल्याने पाणी आलं आहे. बाजूच्या राज्यांसोबत चर्चा सुरु केली आहे. लष्कराला देखील पाचारण केलं आहे. प्रशासन योग्य रितीने सर्व हाताळत आहे.

अग्रलेख

### खरीखरी

## यांचाही विजय, त्यांचाही विजय

आज मुंबईत आझाद मैदान परिसरात संघर्ष करून मराठ्यांचे नेते बनलेले मनोज जरांगे पाटील यांचे सैनिक प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते. जरांगे पाटील यांची ताकद काय आहे, त्यांच्या मागे सकल मराठा समाज कसा उभा आहे. हे आज सर्वांना दिसलेले आहे आणि त्यांनी आपली ताकद दाखवून दिलेली आहे हा त्यांचा विजय म्हटला पाहिजे. पण तिकडे सरकार पक्षानेही अत्यंत सावध भूमिका घेऊन जरांगे पाटील यांचे मन वळविण्यात यश मिळवले आहे हे नाकारता येणार नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न निश्चितच गंभीर आहे. जरांगे पाटलांना आरक्षण पाहिजे आहे आणि ते ओबीसी मधून पाहिजे आहे. ओबीसी नेते यासाठी तयार नाहीत हे स्पष्ट आहे. आरक्षण तर द्यायचेच आहे यासाठी आम्हाला थोडा वेळ द्या असे सरकार तर्फे सांगण्यात आले आहे. जरांगे यांनी सरकारच्या प्रतिनिधींशी चर्चा करून वेळ देतानाही सरकारच्या रडक्या भूमिकेवर म्हणजेच एक एक दिवसाची परवानगी देण्याच्या भूमिकेवर शब्दशः अंगार ओततच चर्चा केलेली आहे. पण सरकारबद्दल कोणतेही तणावपूर्ण कृती किंवा कार्य झाले नाही याचाच फायदा सरकारला झालेला आहे. कारण कोणताही संघर्ष न होता एवढा मोठा आंदोलनाचा दिवस पार पडला. म्हणजेच मनोज जरांगे पाटील यांच्या शांततावादी भूमिकेसह त्यांचे मन वळविण्यात सरकारला यश आले आहे. अर्थातच सरकारचाही विजय आहे. म्हणजेच सरकारलाही कमीपणा नाही आणि मराठा समाजाचेही तात्पुरते का होईना समाधान झाले. ही आनंददायी बाब असली तरी गेल्या दहा वर्षापासून मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न कोर्टाच्या विविध निकालाद्वारे चर्चेमध्ये नेहमीच राहिलेला आहे. आरक्षणाच्या बाबत सध्या पन्नास टक्क्यांची मर्यादा आहे ही मर्यादा महाराष्ट्रात आधीच ओलांडण्यात आलेली आहे. न्यायालयाला यापेक्षा अधिक आरक्षण देता येत नाही. कारण ते मान्य नाही कायद्यातही बसत नाही. ५०% च्या मर्यादेचा कायदा सुरू होण्यापूर्वी तामिळनाडू सारख्या काही राज्यांनी या मर्यादेचे आधीच उल्लंघन केले होते. आता राज्यांना याबाबत निर्णय घेण्याचा घ्यावयाचा असेल तर केंद्र सरकारला आवाहन करून तो निर्णय घेऊ शकतात. कारण तसे अधिकार केंद्र सरकारला आहेत पण केंद्राने महाराष्ट्राच्या बाबतीत निर्णय घेतला तर इतर अनेक राज्यांमध्ये तशीच मागणी होऊ शकते. आपल्या शेजारच्या गुजरातमध्ये अशाच मागणीसाठी एका समाजाला कसे आकर्षित करण्यात आले होते. पण नंतर त्या लढ्याचे नेतृत्व करणारा भाजपच्या दावणीला बांधला गेला आणि त्या आंदोलनाची हवा निघून गेली. मराठा समाजात अत्यंत गरीब असलेला वर्ग फार मोठ्या प्रमाणावर आहे या वर्गालाही सवलत मिळणे निश्चितपणे गरजेचे आहे. आपल्या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मराठा समाजाचे मोठे नेते होते. त्यामुळेच स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांना जवाहरलाल नेहरू यांनी संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीला बोलावले होते. त्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर जवळजवळ १२ ते १३ वर्षे मारोतराव कन्नमवार आणि वसंतराव नाईक या दोन अमराठी तर नेत्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कामगिरी बजावली. मराठा समाजासह महाराष्ट्राचे आपले नेते म्हणून आपले नाव कायम टिकवण्यासाठी यशवंतरावांनी तो प्रयोग केला असावा. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाचे बडे नेते म्हणून बाळासाहेब देसाई यांचे नाव घेतले जात होते त्यांना ते पद कधीच मिळाले नाही. त्यानंतर सुद्धा मराठा समाजाचे अनेक नेते मुख्यमंत्रीपदावर आले त्यांनाही मराठा समाजाचा हा प्रश्न गंभीर आहे असे वाटले नाही. आता आरक्षणाचा प्रश्न एरणीवर आलेला आहे. सरकारला या प्रश्नाचा निकाल लवकरात लवकर लावावाच लागेल. आपल्या मुख्यमंत्र्यांचे कौशल्य यात कमी पडेल असे अजिबात वाटत नाही. त्यांनी या प्रश्नाचा लवकरात लवकर निकाल लावावा हेच केवळ मराठा समाजाच्याच नाही, तर महाराष्ट्राच्याही फायद्याचे आहे. जरांगे आणि सरकार यांच्यामध्ये छोटेमोठे वाद कितीही असले तरी, जरांगे म्हणतात की आरक्षण द्या आयुष्यभर तुमचे ऋण मानत राहू . कारण आजच्या महामोर्चाने एक पाऊल पुढे टाकले आहे. त्यासोबत सरकारनेही एक पाऊल पुढे टाकलेले आहे, त्यामुळे दोघांचाही जयजयकार असो!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# जरांगेंचे उपोषण सुरु





## दक्षिण मुंबई ठप्प | बेस्ट सेवा प्रभावित | सीएसटीएमवर आंदोलकांची गर्दी | अनेक रस्ते बंद

**मराठा समाजाचे लोक मोठ्या संख्येने मुंबईत दाखल झाले आहेत. अनेक ठिकाणी वाहतूकीचा प्रश्न उपस्थित झाला आहे. मुंबईतील अनेक भागात वाहतूककोंडी झाल्याचे बघायला मिळाले. यावेळी आंदोलनाला परवानगी दिल्यामुळे सरकारचे आभार मानताना मनोज जरांगे पाटील दिसले. मात्र, यासोबतच त्यांनी थेट मोठा इशारा दिला आहे. आम्हाला आमरण उपोषण करण्याची परवानगी द्या, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे पाटील यांना एकच दिवसाची उपोषणाची परवानगी दिली आहे. मात्र, जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की, आमच्या सर्व मागण्या या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत आम्ही मुंबई सोडणार नाहीत, हा माझा शब्द आहे.**

थेट आझाद मैदानातून
गजानन तुपे
मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी चलो मुंबईची हाक दिल्यानंतर आज भगवं वादळ अवतरलं आहे. आझाद मैदान काही मिनिटांमध्येच भरल्यानंतर आंदोलकांनी मिळेल त्या रिकामी जागी आसरा घेण्यास सुरुवात केली. पावसामुळे आझाद मैदानात आणि बाहेर मराठा आरक्षण आंदोलकांची गैरसोय झाली. आंदोलनास पोलिसांनी दिलेली परवानगी संपल्यानंतर आता उद्यासाठी त्यांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, मराठा आंदोलकांकडून आज दिवसभर झालेला घटनाक्रम पाहता आणखी काही कडक नियम व अटी पोलिसांकडून लावण्यात आले आहेत. त्यातच, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या परवानगीबाबत मुंबई पोलिस दलातील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी चर्चा करुन १ दिवसाच्या मुदतवाढीचा निर्णय घेतला.

मराठा आंदोलकांकडून आज करण्यात आलेल्या वाहतूक कोंडीबाबत काही नियम व अटींच्या पार्श्वभूमीवर उद्या त्यांच्या आंदोलनास परवागनी मिळणार की नाही, याची चर्चा सुरू असतानाचा आता त्यांना एक दिवसाची परवानगी देण्यात आली. जरांगे पाटलांच्या आंदोलनात नियमा पेक्षा जास्त संख्येने मराठा बांधव उपस्थित होते, तर वाहतूक कोंडी होणार नाही याची हमी देऊनही वाहने रस्त्यात उभी करत वाहत कोंडी करण्यात आली. काही ठिकाणी जाणीवपूर्वक आंदोलक वाहने अडवून धरत होते. सार्वजनिक ठिकाणी गोंधळ होईल या परिस्थितीनुसार आंदोलकांकडून पाऊले उचलली जात होती, या सर्व परिस्थितीकडे बोट दाखवत नियम व अटींच्या आधारे पोलिसांकडून पुढील मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली,

आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनासाठी जे आंदोलन आले ते आता वाशीच्या दिशेने निघाले आहेत. बहुमतांशी आंदोलकांची तिथेच राहण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे, आज दिवसभर मुंबईत आंदोलनस्थळी भेट दिल्यानंतर ते आता वाशीच्या दिशेने निघाले आहेत. मुंबईत ईस्टर्न फ्री वे सुद्धा आता मोकळा झाला आहे, कुठल्याही प्रकारची वाहतूक कोंडी राहिली नाही. एका मागे एक आंदोलकांच्या गाड्या आणि टेम्पो हे वाशीच्या दिशेने जात आहेत.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी आलेले अनेक आंदोलक भिजू नये म्हणून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे धावले. दरम्यान, मराठा आंदोलकांनी मंत्रालयाकडे सुद्धा मोर्चा वळवत घोषणाबाजी केली. मंत्रालयासमोर शेकडो आंदोलक जमले होते. दरम्यान, काही आंदोलक सीएसएमटी मेट्रो सबवेच्या आत आणि जवळच्या बस स्टॉपवरील शेडखाली उभे राहिले. मोठ्या संख्येने लोक आझाद मैदानात पोहोचतील हे माहित असतानाही त्यांनी कोणतीही व्यवस्था केली नाही असा आरोप आंदोलकांनी अधिकाऱ्यांवर केला. दरम्यान, मुंबईतील सीएसएमटी स्टेशन, गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव्ह, दादर स्टेशन, शिवाजी पार्क, गिरगाव चौपाटी यासारख्या प्रमुख ठिकाणी भगव्या टोप्या घातलेले मराठा आंदोलक सर्वत्र दिसत आहेत.

### मी तर संपणार, नाहीतर आरक्षण तरी घेणार - जरांगे पाटील

**ही लढाई आता आरपारची आहे, मागे हटणार नाही. एकतर सरकारला आरक्षण द्यावं लागेल किंवा उपोषण करुन मी तरी मरणार, पण मागे हटणार नाही. आता फक्त आरक्षण घेणार नाही तर त्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय मी आंदोलन मागे घेणार नाही असं मनोज जरांगे म्हणाले. राज्य सरकार मराठा आणि ओबीसींमध्ये वाद लावत असल्याचा आरोप मनोज जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, "आम्ही कधीच असं म्हटलं नाही की ओबीसींचे काढून घ्या आणि आम्हाला द्या. आमच्या नोंदी या १५० वर्षांपूर्वीच्या आहेत. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटमध्ये तशा नोंदी आहेत. त्यामुळे आम्ही कुणाचंही काढून घेत नाही तर ते आमच्या हक्काचं आहे. उलट आमच्याच हक्काचं काढून घेऊन इतरांना दिलंय. अशा प्रकारचं वक्तव्य करुन सरकारच मराठा आणि ओबीसींमध्ये वाद लावत आहे."**

मनोज जरांगे म्हणाले की, "आम्ही आरक्षणासाठी आंदोलन करतोय, पण या ठिकाणची खाऊ गल्ली, हॉटेल बंद करण्यात आले, पाण्याचीही सोय करण्यात आली नाही. आंदोलकांना चहा-पाणी, जेवण मिळू नये म्हणून हे सगळे करण्यात आलं. त्यांना स्वच्छतागृहे मिळू नयेत यासाठी प्रयत्न केलं. आम्ही सरकारशी सहकार्य केलं, त्यांच्या नियमांचे पालन केलं. पण हे सरकार इंग्रजांपेक्षा बेकार आहे. सरकारने आडमुठेपणा केला तर आम्हीही आडमुठेपणा करणार."

देवेंद्र फडणवीस आम्हाला महाराष्ट्राचे संस्कार काय ते शिकवतात, पण त्यांचे कर्तृत्व काय हे त्यांनी सांगावं असं जरांगे म्हणाले. ते म्हणाले की, "फडणवीसांनी धनगरांना फसवलं आणि अजून आरक्षण दिलं नाही. कैकाडी समाज हा पश्चिम महाराष्ट्रात अनुसूचित जातीत आहे, मराठवाड्यात ओबीसी आहे. तर इतर ठिकाणी वेगळ्याच प्रवर्गात आहे. कैकाडी समाज एकाच राज्यात तीन प्रवर्गात आहे हे फडणवीसांचे कर्तृत्व. मराठ्याची एक मुलगी ओबीसी आणि दुसरी जनरल प्रवर्गात, हे तुमचं कर्तृत्व. शेतकरी आत्महत्या करतात हे फडणवीसांचा कर्तृत्व." देवेंद्र फडणवीसांनी अंतरवालीत आंदोलनाला बसलेल्या आया-बहिणींना जर मारलं नसतं तर आम्ही त्यांच्यावर बोललो नसतो. त्या आया-बहिणींवर गुन्हेही यांनी दाखल केले असं जरांगे म्हणाले.

### आंदोलकाचा आत्महत्येचा प्रयत्न

मराठा आरक्षणासाठी उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील यांच्यासह हजारो आंदोलक आज मुंबईत दाखल झाले आहेत. जरांगे पाटील यांनी आझाद मैदान येथे आपल्या उपोषणाची सुरुवात केली, तर दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात मोठ्या संख्येने आंदोलक जमले आहेत. याचवेळी CSTM बाहेर एका आंदोलकाने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, या आंदोलकाने आपल्या अंगावर डिझेल ओतून घेतले होते. मात्र, वेळीच इतर आंदोलक आणि पोलिसांनी त्याला रोखले, त्यामुळे पुढील अनर्थ टळला

### जरांगेंना तातडीने अटक करा; सदावर्ते

गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांना मुंबईत आंदोलनाला परवानगी देऊ नये, अशी मागणी याआधी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा सदावर्ते यांनी कायद्याचा आधार घेत जरांगे यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. जरांगे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेअंतर्गत तसेच मुंबई पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. विशेष म्हणजे सदावर्ते यांनी जरांगे यांच्याविरोदात ऑनलाईन पद्धतीने एक तक्रारही दाखल केली आहे.



सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यामधील रवींद्र लोकरे या आंदोलकाने घरापासून मुंबईपर्यंत थेट सायकलवरून प्रवास केला. २५ तारखेला सायंकाळी साडेसहा वाजता निघून २८ तारखेला सायंकाळी मुंबई सीएसटी या ठिकाणी हा आंदोलक पोहोचला. रात्रभर फुटपाथवर झोपून मराठ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी ३७८ किमीच्या सायकलवर प्रवास करून सकाळी आझाद मैदानाजवळ हा आंदोलक हजर होता.

## शासनाचीही सहकार्याची भूमिका - मुख्यमंत्री

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश व्हावा, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हजारो आंदोलकांसह मुंबईच्या आझाद मैदान परिसरात आंदोलनासाठी बसले आहेत. मुंबईत आंदोलकांनी गर्दी केल्यामुळे गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचा आरोप विरोधक करत आहेत. तसेच आंदोलकांना सोयी-सुविधा पुरविल्या गेलेल्या नाहीत, असाही आरोप विरोधकांनी केला. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.



आंदोलनावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मनोज जरांगे पाटील उपोषणासाठी बसले आहेत. आज सकाळी आंदोलक मुंबईत आले. मुंबईत काही ठिकाणी रास्ता रोको करण्याचे प्रकार घडले. मात्र पोलिसांनी समजूत घातल्यानंतर आंदोलक बाजूला झाले. जरांगे पाटील यांनीही शांततेत आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. शासनाचीही सहकार्याची भूमिका आहे. लोकशाही पद्धतीने आंदोलन होत असेल तर त्याला कुठलीच मनाई नाही.

“उच्च न्यायालयाने जे निर्देश दिले आहेत, त्यानुसार सरकार सर्व काही मदत देईल. इतक्या मोठ्या प्रमाणात लोक आल्यानंतर काही प्रमाणात अडथळा निर्माण होतो, तो वाहतुकीला होताना दिसत आहे. काही लोकच अतिउत्साही पद्धतीने वागतात, त्यामुळे संपूर्ण आंदोलनाला गालबोट लागते. पण अशाप्रकारे कुणी वागू नये, याकडे लक्ष द्यावे लागेल. मनोज जरांगे पाटील यांनीही अलोकतांत्रिक आणि आडमुठे पद्धतीने वागू नये, असे आवाहन केलेले आहे”, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला एक दिवसाची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे किती दिवस आंदोलन चालणार? असा प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आंदोलनाला एक दिवसाची परवानगी मिळाली होती. मात्र त्यांनी पुन्हा परवानगी मागितली आहे. कायद्याच्या चौकटीत राहून उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पोलीस पालन करतील. आंदोलनकर्ते आणि प्रशासन यांच्यातील हा प्रश्न आहे.

मनोज जरांगे पाटील मुंबईत आंदोलनासाठी आल्यानंतर विरोधकांची भाषा बदलली आहे. सकाळपासून जे विधाने केली जात आहेत, ती मी ऐकली. विरोधकांना यातून राजकीय पोळी भाजायची आहे, असे दिसते. पण यात त्यांचेच तोंड भाजले जाईल, अशी टीका मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

## ओबीसी आरक्षण काढून देता येणार नाही, कायद्याच्या चौकटीत बसेल ते देऊ, मराठ्यांचे नुकसान होऊ देणार नाही : एकनाथ शिंदे

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आज मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत. यावेळी, भाषण करताना आता मागे हटणार नाही, सककारने गोळ्या घातल्या तरी चालतील पण आम्ही ओबीसीतून आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिला आहे. आरक्षणाच्या याच मुद्द्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, बोलताना गोळ्या घालणं हे सरकारचं काम नाही. कुणाचही आरक्षण कमी न करता, कुणालाही नुकसान न होऊ देता, जे योग्य आणि शक्य आहे ते सरकार करेल, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदेंनी दिली. यावेळी, त्यांनी नाव न घेता तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवरही टीका केली.



मराठा समाजाला १० टक्के आरक्षण मी दिलं, कुणबी नोंदी केल्या. मराठा समाजातील कुणबी नोंदी शोधण्याचं काम शिंदे समिती आजही करत आहे. मराठा समाजाला आरक्षण दिले ते हायकोर्टात टिकले. मात्र, सुप्रीम कोर्टात काही लोकांमुळे ते टिकलं नाही. महाविकास आघाडीचं जेव्हा सरकार होतं, तेव्हा त्यांनी बाजू मांडायला पाहिजे होती, ती त्यांनी मांडली नाही. राज्यात माझं सरकार आलं तेव्हा मी १० टक्के आरक्षण दिलं, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी मराठा आरक्षणावर आपली भूमिका मांडली. आपण मराठा समाजाला दिलेलं आरक्षण टिकवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही शिंदेंनी म्हटले.

ओबीसी समाजाचं आरक्षण काढून किंवा इतर कुठल्याही समाजाचे काढून मराठा समजाला आरक्षण देता येणार नाही. कायद्याच्या चौकटीत जे बसेल ते देण्याची भूमिका सरकारची आजही आहे. ज्या सुविधा ओबीसी समाजाला मिळतायेत त्या मराठा समाजालाही आम्ही देतो. जे योग्य आहे, नियमात बसतंय, त्यासाठी सरकार अजूनही सकारात्मक आहे, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केली.

## पंतप्रधान मोदींचे जपानी उद्योगांना ‘मेक इन इंडिया’चे आवाहन

टोक्यो, दि. २९ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भारत-जपान आर्थिक शिखर परिषदेतील भाषणाने त्यांच्या जपान दौऱ्याची सुरुवात केली. जपान आणि भारताबाबत बोलताना ते म्हणाले की, “भारताच्या विकास प्रवासात जपान नेहमीच एक महत्त्वाचा भागीदार राहिला आहे. मेट्रो रेल्वेपासून उत्पादनापर्यंत, सेमीकंडक्टरपासून स्टार्टअपपर्यंत, जपानी कंपन्यांनी भारतात ४० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे.” यावेळी पंतप्रधान मोदींनी जपानी उद्योगांना ‘मेक इन इंडियाचे’ आवाहन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारतात राजकीय स्थिरता, आर्थिक स्थिरता, धोरणांमध्ये पारदर्शकता आहे. आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था



आहे आणि लवकरच ती जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे.

भारत-जपान शिखर परिषदेत देशाच्या विकासावर बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, “काही आठवड्यांपूर्वी, आमच्या संसदेने एक नवीन आणि सरलीकृत कर व्यवस्था मंजूर केली आहे. संरक्षण आणि अवकाश क्षेत्रांनंतर, आम्ही अणुऊर्जा क्षेत्र देखील खाजगी क्षेत्रासाठी खुले करत आहोत. भारतातील या बदलामागे सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनाचा आमचा दृष्टिकोन आहे.”

ते पुढे म्हणाले की, “जग फक्त भारताकडे पाहत नाही, तर ते भारतावर अवलंबून आहे. गेल्या दशकात, भारताने पुढच्या पिढीतील गतिशीलता आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती केली आहे. आमच्या बंदरांची क्षमता दुप्पट झाली आहे. जपानच्या सहकार्याने, मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पावर काम सुरू आहे.”

“एकत्रितपणे, आपण ग्लोबल साऊथच्या, विशेषतः आफ्रिकेच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतो. मी तुम्हाला आग्रह करतो की, तुम्ही भारतात या आणि जगासाठी निर्मिती करा. (मेक इन इंडिया, मेक फॉर वर्ल्ड) सुझुकी’ आणि ‘डायकिन’च्या सक्सेस स्टोरीज तुमच्याही सक्सेस स्टोरीज बनू शकतात”, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी संध्याकाळी नवी दिल्लीहून टोकियोला रवाना झाले होते. ते शुक्रवारी टोकियोत दाखल झाले. ते १ सप्टेंबरपर्यंत जपानमध्ये असणार आहेत. त्यानंतर ते चीनला रवाना होतील. जपान दौऱ्याचा उद्देश जपानी पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्यासोबत वार्षिक भारत-जपान शिखर परिषदेत सहभागी होणे आहे.


पंतप्रधान नरेंद्र मोदी जवळजवळ सात वर्षांनी जपानला भेट देत आहेत. त्यांचा दौरा पूर्णपणे द्विपक्षीय अजेंड्यावर आधारीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जपान दौऱ्याबद्दल गेल्या मंगळवारी माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले होते की, यामुळे दोन्ही देशांतील सहकार्याचे नवे मार्ग उघडतील आणि इंडो-पॅसिफिक प्रदेश आणि त्यापलीकडे शांतता, समृद्धी आणि स्थिरतेसाठी सामायिक वचनबद्धता आणखी भक्कम होईल.

## आंदोलक दहशतवादी नाहीत, ती मराठी माणसे

### उद्धव ठाकरेंनी महायुती सरकारला सुनावले

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

मुंबईमध्ये मनोज जरांगे यांचे मराठा आरक्षणासाठीचे उपोषण सुरू झाले. आझाद मैदानात मराठा आरक्षण समर्थक मोठ्या संख्येने जमा झाल्यानंतर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका मांडली. यावेळी त्यांनी सरकारला खडेबोल सुनावले. इतर दहा जणांना भूमिका विचारण्यापेक्षा थेट आंदोलकांशी बोला आणि प्रश्न सोडवा, असे ते म्हणाले.



"मी सांगतोय की, पूर्ण जबाबदारी सरकारची आहे. ज्यांनी ज्यांनी आरक्षण देऊ म्हणून शड्डू ठोकले होते. ते लोक आता कुठे आहेत? आता गावी पळाले आहेत. आता नुसती दर्शनं घेत आहेत. एवढा जनता जनार्दन मुंबईत आल्यावर त्यांना सामोरं जा. नुसतं घरोघरी काय फिरत आहात?", असा टोला उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना लगावला. मराठा आरक्षणाच्या मागणीबद्दल आता तुमची भूमिका काय आहे? असा प्रश्नही ठाकरेंना विचारला गेला. ते म्हणाले, "माझ्या भूमिकेला आता काहीच अर्थ नाहीये. माझं म्हणणं मी तेव्हा मांडलं आहे. मी अंतरवाली सराटीमध्ये गेलो होतो, तेव्हा मनोज जरांगेंच्या समोर उभं राहून बोललो होतो."

"आता माझं मत असं आहे की, त्यांनी हा प्रश्न हाताळला पाहिजे. त्यांनी हा प्रश्न सोडवला पाहिजे. दहा जणांना त्यांच्या भूमिका विचारण्यापेक्षा तुम्ही आणि आंदोलक थेट बोला ना", असे उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारला सुनावले.

जरांगे दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचं कौतुक करतात आणि मुख्यमंत्र्यांवर टीका करतात. याबद्दल तुम्हाला आश्चर्य वाटत नाही का? असं जेव्हा ठाकरेंना विचारण्यात आलं. ते म्हणाले, "हा शेवटी जरांगे पाटलांचा विषय आहे. त्यांना कुणाकडून काही अनुभव आले असतील, तर ते त्याप्रमाणे बोलत असतील. पण, काही जरी झालं; ज्यांचं ते आता कौतुक करत आहेत. त्यांनी (शिंदे) सुद्धा त्यांना (जरांगे) फसवलंच आहे ना? अडीच वर्ष मुख्यमंत्री होते, आता वर्षभर उपमुख्यमंत्री आहेत. का त्यांना न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे फक्त टोलवाटोलवी या सरकारकडून सुरू आहे", अशी टीकाही ठाकरेंनी केली. आंदोलन चिघळण्याच्या शक्यतेचा मुद्दा जेव्हा उद्धव ठाकरेंकडे मांडला गेला, तेव्हा ते म्हणाले, "आंदोलक हे काही दहशतवादी नाहीत. ते मराठी माणसं आहेत. ते हक्काने विघ्नहर्त्याच्या उत्सवातच न्याय मागायला आले आहेत. त्यांना असं वाटतं असेल की, सरकार देऊ शकत नाही, तर विघ्नहर्त्या तूच आमच्यावरच संकट दूर कर", अशी भूमिका ठाकरेंनी मांडली.

# श्री गणेशाचे अर्थकारण : आर्थिक मंगलमय

भारतात प्रत्येक सणाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. सणांचा स्थानिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवरही मोठा प्रभाव पडतो. भारतात गणेश उत्सव मोठ्या उत्सवात साजरा होत असतो. गणेश उत्सवाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वाबरोबरच आर्थिक क्रियाकलापांना चालना देण्यात महत्त्वाची भूमिका आहे. गणेश उत्सव आर्थिक घडामोडींना चालना देणारी सर्वात मोठी प्रेरणा आहे, विशेषतः पुणे, मुंबई, नाशिक मध्ये या उत्सवातून कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होते. या काळात ४५,००० ते ५०,००० कोटी रुपयांचा व्यवसाय होण्याची शक्यता असते. भव्यता आणि श्रद्धेचे प्रतीक असलेल्या गणेश उत्सवामुळे विविध क्षेत्रांमध्ये मागणी वाढते. पुणे, मुंबई आणि नाशिक सारख्या शहरांमध्ये दर वर्षीच्या तुलनेत मंडप सजावटीच्या मागणीत ५०% ते ६०% नी वाढ झालेली आहे. महत्त्वाचे म्हणजे पर्यावरणीय शाश्वततेबद्दल वाढत्या जागरूकतेमुळे पर्यावरणपूरक मूर्तींची मागणी लक्षणीयरीत्या वाढली आहे.

गणेश उत्सव हा किरकोळ स्थानिक बाजारपेठे बरोबरच लघु, मध्यम आणि मोठ्या व्यवसायांसाठी मोठी पर्वणीच असते, ज्यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते.लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एसएमई) व्यवसायात ३५ ते ४०% वाढ झाली आहे आणि मूर्ती निर्मात्यांनी ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक व्यवसाय केला आहे. पर्यटन उद्योगालाही फायदा होतो, तर ई-कॉमर्स प्लॅटफॉर्ममध्ये ४० -४५% वाढ दिसून येते. एकूणच, गणेशोत्सवाचा विविध आर्थिक क्षेत्रांवर मोठा परिणाम होतो.गणेश उत्सव काळात खर्चाला सीमा नसते. गणेश उत्सवात सरासरी भारतीय १००० ते १०,००० रुपयांपर्यंत खर्च करतो. बाजारपेठ तेजीत असते. स्मार्टफोन, लॅपटॉप, रेफ्रिजरेटर आणि टेलिव्हिजन, टूव्हिलर आणि चारचाकी गाडी यासारख्या महागड्या वस्तूंची मागणीही वाढत आहे. या मागणीला प्रतिसाद म्हणून, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी मोठ्या टिकाऊ वस्तू अनेकदा ७०-८०% सवलतीत विकल्या जातात. गणेश उत्सवाचा फायदा विविध क्षेत्रांना होतो, ज्यामध्ये किरकोळ उद्योग हा सर्वात मोठा फायदा मिळवणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. या काळात ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स आणि व्हाईट गुड्सची विक्री गगनाला भिडली आहे, तर जलद गतीने वाढणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तू (FMCG) च्या विक्रीतही लक्षणीय वाढ दिसून येते. गणेशोत्सवादरम्यान स्थानिक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. गणेशोत्सवाचे प्रमाण वाढत असताना, त्याचा सकारात्मक आर्थिक परिणाम वाढता आहे. म्हणूनच गणेश उत्सवाचे आर्थिक महत्त्व आहे. २०२४ च्या गणेशोत्सवातून मिळणारे आर्थिक उत्पन्न कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स CAIT च्या अहवालानुसार, या उत्सवातून २५,००० कोटी रुपयांहून अधिकचा व्यवसाय झाला. यामध्ये मूर्ती, सजावट, मिठाई, आणि इतर वस्तूंच्या विक्रीत वाढ झाली. मिठाईची दुकाने आणि घरगुती व्यवसायांनी २००० कोटींपेक्षा जास्त विक्री वाढवली आहे. या उत्सवामुळे केटरिंग आणि स्नॅक्स व्यवसायात वाढ होते कारण कुटुंबे जवळजवळ ३००० कोटी रुपयांचे मोठे मेळावे आणि जेवण आयोजित करतात. गणेश उत्सव नवीन सुरुवात, समृद्धी आणि वाढीचा काळ आहे. व्यवसाय मालकांसाठी, हा सणाचा काळ व्यवसाय वाढविण्यासाठी, उपकरणांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी किंवा वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी इन्व्हेंटरीचा साठा करण्यासाठी एक उत्तम संधी आहे. गणेश उत्सवातून विविध व्यवसायांमध्ये, जसे की मूर्तिकार, सजावट साहित्य विक्रेते, कपडे विक्रेते आणि अन्न विक्रेते, मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होते, ज्यामुळे अनेक लोकांना रोजगार मिळतो आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून तो एक मोठा आर्थिक स्त्रोत बनला आहे, ज्यामुळे लाखो लोकांची खरेदी क्षमता वाढते आणि लघु-मध्यम उद्योगांना फायदा होतो. गणेश उत्सवात उत्पन्नाचे मुख्य



स्त्रोत म्हणजे गणपतीची मूर्ती निर्मिती आणि विक्री होय. गणेश मूर्तिकार आणि कलाकारांना या काळात भरपूर उत्पन्न मिळते. सजावटीचे साहित्य, सामानाचे विक्रेते, रोषणाई आणि विद्युत दिव्यांचे विक्रेते तसेच सजावटीच्या वस्तू विकणाऱ्यांना मोठा फायदा होतो. पूजेसाठी लागणारी फुले, फळे आणि इतर धार्मिक साहित्य विकणाऱ्यांची विक्री वाढते. गणेशोत्सवासाठी लागणारे खाद्यपदार्थ आणि मिठाई विक्रेते लाडू, मोदक आणि इतर पदार्थ बनवणाऱ्यांना आणि ते विकणाऱ्यांना चांगला व्यवसाय मिळतो. कुटुंबे मोठ्या संख्येने मेळावे आणि जेवणाचे आयोजन करतात, ज्यामुळे केटरिंग सेवा आणि खाद्यपदार्थ उद्योगांना फायदा होतो. या काळात कपडे, दागिन्यांची आणि इतर गृहोपयोगी वस्तूंची विक्री वाढते, ज्यामुळे संबंधित विक्रेत्यांना आर्थिक लाभ होतो. उत्सव आणि कार्यक्रमात मुख्य आकर्षण अनेक मंडळे आणि संस्था गणेशोत्सवाचे आयोजन करतात, ज्यामुळे जाहिरातदार आणि प्रायोजक यांचा खर्च वाढतो आणि त्यातूनही उत्पन्न मिळते. पर्यावरणाबद्दल वाढत्या जागरूकतेमुळे मातीच्या मूर्ती आणि इतर पर्यावरणपूरक सजावटीच्या साहित्यांची मागणी वाढली आहे, ज्यामुळे नवीन व्यवसायांना प्रोत्साहन मिळत आहे. गणेशोत्सवामुळे अनेक तात्पुरत्या स्वरूपाच्या नोकऱ्या निर्माण होतात, ज्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होते.

श्री गणेशाचे अर्थकारण म्हणजे ज्ञान, दूरदृष्टी, संयम, संचय, प्रामाणिकपणा आणि इच्छांवर नियंत्रण ठेवून जीवन व आर्थिक व्यवहार यशस्वी करणे.श्री गणेशाचे मोठे डोके ज्ञान व दूरदृष्टी आपल्याला आर्थिक व्यवहारात दूरदृष्टी ठेवणे शिकवते. फक्त आजचा नफा नव्हे, तर भविष्याचा विचार करून गुंतवणूक व बचत करावी.लहान डोळे एकाग्रता व निरीक्षणशक्तीने व्यापारी व आर्थिक व्यवहार करताना सूक्ष्म निरीक्षण असावे. प्रत्येक खर्च व गुंतवणुकीवर बारीक लक्ष ठेवावे. गणपतीचे मोठे कान सर्वांचे ऐकणे तसेच अर्थकारणात सल्ला घेणे एकतर्फी निर्णय टाळावेत. गणपतीच्या सोंडेप्रमाणे अर्थकारणात लवचिक व कुशलता असावी. बदलत्या परिस्थितीत जुळवून घेणे गरजेचे असते. बाप्पाचे मोठे पोट हे संचयाचे व सहनशीलतेचे प्रतीक आहे. आर्थिक व्यवहारात बचत करणे, संकट काळासाठी राखीव निधी ठेवणे शिकवते. एका दाताचे प्रतीक म्हणजे अर्थव्यवहारात प्रामाणिकपणा व सातत्य ठेवल्यास दीर्घकालीन यश मिळते. बाप्पाचे वाहन उंदीर हा चंचलतेचे प्रतीक आहे. आर्थिक जीवनात अनावश्यक खर्च, इच्छा व हव्यासावर नियंत्रण ठेवणे शिकवते. हातातील प्रसाद लाडू योग्य नियोजन व संयमाने केलेल्या अर्थकारणाचे फळ म्हणजे समृद्धी व आनंद प्राप्ती देते.

आपल्या संस्कृतीत गणपती बाप्पाला "बुद्धीचा अधिपती" म्हटले जाते. श्री गणेशाच्या मूर्तीतील प्रत्येक गोष्ट आपल्याला जीवन आणि अर्थकारणाचे सुंदर धडे शिकवते. गणेशोत्सव धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विविधतेत भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणारा एक महत्त्वाचा आर्थिक स्त्रोत आहे. थोडक्यात, गणेशोत्सव आर्थिक विकासाला चालना देणारा असून तो रोजगारनिर्मिती, उद्योग, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांना मोठा हातभार लावतो.



**- डॉ. जयश्री पंढरीनाथ जाधव- कदम**
**सहाय्यक प्राध्यापक- अर्थशास्त्र**
**के.टी.एच.एम.कॉलेज, नाशिक**

## महत्त्वाचे

### स्वामी विवेकानंद विद्यालयात गणेशमूर्ती सजावट स्पर्धा

**नाशिक ।** स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम येथे विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून साकारलेल्या इको-फ्रेंडली गणेशमूर्ती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा




उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सण साजरा करण्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या पर्यावरण पूरक शाडू मातीच्या गणेशमूर्ती आकर्षक पद्धतीने सजवून शाळेत आणल्या. यावेळी मूर्तींचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक विजेत्यांची निवड केली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी सजावटीसाठी प्लास्टिक अथवा अपायकारक साहित्य न वापरता नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर केला होता. याप्रसंगी मुख्याध्यापक किशोर झोटिंग, पर्यवेक्षिका शुभदा टकले, उपशिक्षिका दीपा काला, मनीषा पवार, सुप्रिया पठारे, शिक्षक पुंडलिक बागुल, प्रदीपसिंग पाटील, तसेच शिक्षकेतर सहकारी वृंद उत्तम गाडे, रेशमा भोये विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. आपला सण–आपली जबाबदारी" हा संदेश देत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन यावेळी इको क्लबच्या माध्यमातून करण्यात आले.

### महिरावणीतील मातोश्री पाटील विद्यालयात गणेश स्थापना

**नाशिक ।** महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयात



वाजतगाजत श्रीगणेशाची स्थापना मुख्याध्यापक अशोक भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सकाळपासूनच शाळेचा परिसर भक्तिमय आणि उत्साही वातावरणाने भरून गेला होता. ढोल पथकाच्या गजरात विद्यार्थ्यांनी नृत्य करत बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन व आरती विधीपूर्वक पार पडली. दिलीप खांडबहाले यांनी या संपूर्ण आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कलाकृती, पर्यावरणपूरक सजावट आणि ढोल पथकाच्या गजरात संपूर्ण परिसर गणेशमय झाला होता. यावेळी 'गणपती बाप्पा मोरया!' च्या जयघोषांनी शाळा दुमदुमून गेली. मुलांमधील उत्साह आणि आनंद पाहण्यासारखा होता. ज्यावेळी ज्येष्ठ शिक्षक संजय पवार, सुरेखा भामरे(आहेर), समाधान शेवाळे, देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, दिपाली वाडीले, अश्विनी चौरे,अतुल कुलथे, विलास येवले आदिंसह सर्व विद्यार्थ्यांनी श्रद्धेने सहभाग घेत यशस्वीरित्या पार पाडला.

## प्रा. कैलास काळेंना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**सिन्नर ।** तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे प्रा. कैलास काळेंना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांनी नोकरीला लागल्यापासून आजपर्यंत ज्या सामाजिक सेवा केल्या आहे, त्याकरिता यांना अगोदर अनेक संस्थांचे पुरस्कार मिळालेले आहेत. ते स्वत: १९९९ पासून संस्थेच्या समाजदिनानिमित्त गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करतात. अर्थशास्त्र या विषयाची गोडी निर्माण होण्यासाठी नोकरीत लागल्यापासून आज तागायत बारावी बोर्ड परीक्षेत सर्वात अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यास त्यांच्याकडून रोख बक्षीस दिले जाते.



विशेष म्हणजे त्यांनी आत्तापर्यंतच्या एकूण सेवेमध्ये १९९९ ते २०१५ पर्यंत तासिका तत्त्वावर काम केले आहे व १९९९ ते २००७ पर्यंत २० रुपये घड्याळी तास म्हणजे अवघे सहाशे रुपये महिना वेतन घेतले. २००७ ते २०१३ पर्यंत ७२ रुपये घड्याळी तास म्हणजे २३०४ महिना वेतन मिळत होते. २०१३ ते २०१५ दहा हजार रुपये वेतन घेतले. २०१५ पासून त्यांची पूर्णवेळ शिक्षक म्हणून नेमणूक झाली. त्यांनीनी २०१७ ते २०२३ पर्यंत संस्थेतील गरीब विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी पाच हजार रुपयांचा धनादेश देऊ केला. त्याचप्रमाणे कोरोना काळामध्ये त्यांनी पाच ते सहा गरीब कुटुंबांना विवाह प्रसंगी मदत केली. आपल्या आईच्या स्मरणार्थ मातृदिनाच्या दिवशी २०२३ मध्ये त्यांनीनी म.वि.प्र. संस्थेसाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश सरचिटणीस नितीन ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला. पिंपळगाव बसवंत येथे असताना त्यांना भारत विकास प्रबोधिनी यासंस्थेने सर्व शैक्षणिक, सामाजिक कार्याचा विचार करून ग्लोबल इंडिया गोल्ड मेडल अवॉर्ड प्रदान करण्यात आला. स्थानिक प्रशासन आणि संस्थेने अनेक वेळेला त्यांचा सत्कार केला आहे. भारत विकास प्रबोधनी या संस्थेने पुन्हा एकदा म्हणजे २०२३ मध्ये भारतरत्न मदर तेरेसा गोल्ड मेडल अवॉर्ड प्रदान केला. सिन्नर महाविद्यालयामध्ये काम करत असताना त्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक नवीन सेवा सुरू केली. २०२४-२५ यावर्षी संस्थेच्या समाज दिनी २५ विद्यार्थ्यांना वह्या आणि अर्थशास्त्र पुस्तकांचे वाटप केले. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षी अकरा गरजू विद्यार्थ्यांना वह्या पुस्तकाचे संस्थेच्या समाजदिनी वाटप केले. त्यांचे हे कार्य सेवानिवृत्ती पर्यंत सुरू असेल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या पुरस्काराबद्दल प्रमुख पाहुणे आणि प्राचार्यांनी त्यांचा सत्कार केला. त्यांच्या या सर्व कार्याचा विचार करून तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था नाशिक यांच्यातर्फे त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांना लेखक, साहित्यिक प्रा. संजय पवार आणि अभिनेत्री मेघा डोळस यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

## विलास बोडके यांनी स्वीकारला नाशिक जिल्हा माहिती अधिकारीपदाचा कार्यभार

**नाशिक ।** नाशिकचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून विलास मुरलीधर बोडके यांनी प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी गोपाळ साळुंखे यांच्याकडून पदभार स्वीकारला. बोडके हे धुळे येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. बोडके यांनी यापूर्वी ही नाशिक येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कामकाज केले आहे.



यावेळी कार्यालयाच्यावतीने माहिती अधिकारी गोपाळ साळुंखे, उपसंपादक किरण डोळस, वरिष्ठ लिपिक जालिंदर कराळे, सूरज लचके, सहायक छायाचित्रकार मनोज अहिरे, नवनाथ पालवे, सुरेश कुमावत, परेश पाटील आदिंनी त्यांचे स्वागत केले. बोडके हे दिंडोरी तालुक्यातील रामशेज (आशेवाडी) येथील मूळ रहिवासी आहेत. त्यांनी आपल्या शासकीय सेवेची सुरूवात सप्टेंबर, १९९६ ला धुळे जिल्हा माहिती कार्यालयापासून केली. त्यानंतर उप माहिती कार्यालय, मालेगाव, जि. नाशिक व विभागीय माहिती कार्यालय, पुणे येथे तसेच सन २०१० ते २०१७ या कालावधीत मंत्रालय, मुंबई येथे विभागीय संपर्क अधिकारी म्हणून कामकाज केले.

सन २०१७ मध्ये त्यांना जिल्हा माहिती अधिकारी म्हणून जळगाव येथे पदोन्नती मिळाली. त्यांनी जळगावसह धुळे, नाशिक येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून काम केले आहे, तर नंदुरबार येथील जिल्हा माहिती अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळलेला आहे.

## अशोका मेडिकव्हरमधील ओपीडी विभागांना नवी ओळख

### रुग्णांच्या सोयीसाठी फुलांच्या क्लस्टरनुसार नाविकरण




**नाशिक ।** रुग्ण व नातेवाईकांना आवश्यक विभाग शोधणे अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे ओपीडी विभागांचे पुनर्नामिकरण करून त्यांना फुलांच्या क्लस्टरनुसार ओळख देण्यात आली आहे.

क्लस्टर गुलाब असेल तर कार्डियोलॉजी, न्युरो, नेत्ररोग, दंतचिकित्सा, हेल्थ चेकअप इत्यादी. क्लस्टर ऑर्किड जनरल मेडिसिन, ईएनटी, ऑर्थोपेडिक्स, डायबेटीस, फार्मसी इत्यादी. क्लस्टर लिली पचनसंस्थेचे आजार, गॅस्ट्रोएन्टरोलॉजी, बॅरिएट्रिक सर्जरी, लिव्हर ट्रान्सप्लांट इत्यादी. क्लस्टर डेझी पेडियाट्रिक्स, निओनॅटॉलॉजी, लसीकरण. क्लस्टर कमळ युरोलॉजी, नेफ्रोलॉजी, डायलेसिस, किडनी ट्रान्सप्लांट इत्यादी. हा उपक्रम प्रमुख अतिथी नीरज लाल, रिजनल हेड महाराष्ट्र आणि कर्नाटक, मेडिकव्हर हॉस्पिटल्स यांच्या हस्ते तसेच केंद्र प्रमुख अनुप त्रिपाठी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलचे रिजनल हेड नीरज लाल यांनी सांगितले की, "आमचे ध्येय रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा देणे हे आहे. क्लस्टरनुसार नाविकरणामुळे रुग्णांना विभाग शोधणे सोपे होईल आणि त्यांना वेळेची बचत होईल. ही पद्धत एक आधुनिक, रुग्ण-केंद्रित आरोग्यसेवेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल हे नाशिकमधील एक अग्रगण्य मल्टी-सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असून येथे कार्डियाक सायन्सेस, न्युरोसायन्सेस, ऑर्थोपेडिक्स, गॅस्ट्रोएंटरोलॉजी, युरोलॉजी, नेफ्रोलॉजी, पीडियाट्रिक्स यांसारख्या विविध विभागांत जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि आधुनिक सुविधा यांच्या मदतीने हे रुग्णालय रुग्णांच्या आरोग्यसेवेत सतत नावीन्य आणत आहे.

## मनमाड शहर परिसरात गणरायाची मंगलमय वातावरणात प्राणप्रतिष्ठा

**मनमाड ।** शहर आणि परिसरात ढोल ताशाचा निनाद, बँन्ड पथकातील कलावंताचे मधूर वादन, वाजत गाजत , पृष्पवृष्टी करत फटाक्यांच्या आतषबाजीत आनंद आणि जल्लोषात श्री गणरायांचे आगमन झाले. दहा दिवसांच्या चैतन्यमय पर्वाला अभुतपूर्व उत्साहात प्रारंभ झाला.गेल्या अनेक वर्षापासुन परंपरा असलेल्या शहराच्या आराध्य दैवत आणि नवसाला पावणारा गणपती म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीनिलमणी गणेश मंदिरातील श्री निलमणीच्या पार्थिव मूर्तीची स्थापना सवाद्य मिरवणूक लक्ष वेधले होत.





घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळात श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. वर्षभराची मरगळ झटकून गणेश भक्त , मंडळाचे कार्यकर्ते महिला , युवती आणि आबालवृध्द गणेश भक्त असे सारेच गणरायांच्या स्वागतात मनोभावे तल्लीन झाले होते. यानिमित्त शहर व परिसरात सर्वत्र उत्साहाचे वातावरण बघायला मिळाले.गणरायाच्या आगमनामुळे सकाळपासून मनमाडची बाजारपेठ भाविकांच्या गर्दीने फुलून गेली. पुजेसाठी सजावटीचे साहित्य, फुले, फळे, नैवेद्यासाठी लागणारे मोदक आदी खरेदी करण्यासाठी गर्दी उसळली होती.गणेश चतुर्थीच्या पूर्व संध्येला अनेक मंडळांनी वाजत - गाजत श्रींना सभामंडपात आणले. सुखकर्ता दु:खहर्ता विघ्नहर्त्याचे बुधवारी शहर आणि परिसरात उत्साहात आगमन झाले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. यंदा शहरात मंडळांची संख्याही वाढली आहे.शहरात २० मोठे , ८८ मध्यम व लहान असे जवळपास १०२ गणेश मंडळाची नोंदणी बुधवारी दुपारपर्यंत मनमाड पोलिस स्थानकात करण्यात आली होती.तर मनमाड पोलीस हद्दीत येणाऱ्या अशा ७ ठिकाणी , एक गाव एक गणपती संकल्पना राबविण्यात आली आहे. दरम्यान मनमाड शहरात बंदोबस्तासाठी एक पोलीस निरीक्षक, ४ दुय्यम अधिकारी, ४० पोलीस कर्मचारी, ६० होमगार्ड आणि बंदोबस्तासाठी ८ बाहेरू आलेले पोलीस असे ११३ कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त शहरातील विविध भागात लावण्यात आला आहे.

## महत्त्वाचे

### गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला; बोलठाणला मंदावलेली खरेदी

**नांदगाव ।** लाडक्या गणरायाचे आगमन होत असल्याने बोलठाण परिसरासह संपूर्ण



नांदगाव तालुक्यात उत्साहाचे वातावरण आहे. श्रींच्या स्वागतासाठी बाजारपेठेत रंगत आणण्यासाठी सजावटीचे साहित्य व गणेश मूर्तींची खरेदी सुरू झाली असली तरी यावर्षी अपेक्षेइतकी ग्राहकांची गर्दी दिसून आली नाही. दरवर्षीपेक्षा विक्रीत घट झाल्याची खंत स्थानिक विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे. "भाविक येत आहेत, परंतु खरेदी मात्र कमी होत आहे. मंदीचे वातावरण असल्याने धंदा मार खाल्ल्यासारखा वाटतोय," असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. नांदगाव शहर व तालुक्यात एकूण ९१ सार्वजनिक गणेश मंडळे सज्ज होत असून, शहरातील १५, ग्रामीण भागातील ३३ आणि "एक गाव एक गणपती" उपक्रमांतर्गत ४३ मंडळांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. श्रींच्या स्वागतासाठी शहरासह बोलठाणमध्ये प्रमुख रस्त्यांवर भव्य कमानी उभारण्यात आल्या आहेत. गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते दिवसभर प्रतिष्ठापना मंडप सजावटीत व्यस्त आहेत. बाजारपेठेत लहान ते मोठ्या सर्व आकारातील गणेश मूर्ती उपलब्ध असून घरगुती मूर्तींपासून मंडळांसाठीच्या भव्य मूर्तींपर्यंत भाविक खरेदी करत आहेत. तरीही, मंदीच्या सावटामुळे विक्रीला अपेक्षित गती मिळत नसल्याचे बोलठाण बाजारातील व्यापाऱ्यांनी सांगितले. भाविकांचा उत्साह कायम असला तरी व्यापारी मात्र नाराज असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर दातली येथे साकारले झाडात गणराय...

**नाशिक ।** सिन्नर तालुक्यातील दातली येथे व्ही. एन नाईक शिक्षण संस्थेच्या



माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गणेश उत्सवानिमित्त प्राचार्य इ.के. भाबड यांच्या संकल्पनेतून पर्यावरण पूरक गणेशाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यालयाचे कलाशिक्षक संजय भारस्कर यांच्या नावीन्य पूर्ण कलेतून विद्यालयाच्या प्रांगणात असणाऱ्या लिंबाच्या झाडाच्या खोडात हुबेहूब दिसणारी गणरायाची मूर्ती साकारून झाडांमध्ये साक्षात देव असतो ही नवीन पर्यावरण पूरक संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजावली जात आहे.झाडांवरती आपुलकीची भावना तयार होऊन विद्यार्थी झाडांचे संरक्षण करण्यासाठी जागरूक व्हावेत यासाठी ही संकल्पना साकारली आहे.विद्यार्थी वर्ग तसेच परिसरातील पालक,नागरिक व तरुण झाडातील गणपती पाहण्यासाठी व दर्शनासाठी मोठ्या संख्येने येत आहे. विद्यार्थ्यांमार्फत रोज सकाळी व संध्याकाळी गणेशाच्या आरतीचे व प्रसादाचे नियोजन करण्यात आलेले आहे. या विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने विद्यार्थ्यांचे विशेष उद्बोधन व्हावे यासाठी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे व व्याख्यानाचे नियोजन या निमित्ताने केलेले आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विशेष परिश्रम घेत आहे.

### शालेय शिक्षण अभ्यासक्रम लवचिक व्हावा; आग्रही मागणी

**नाशिक ।** शालेय शिक्षण अभ्यासक्रम मसुदा २०२५ हा विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन अधिक लवचिक आणि अधिक परिणामकारक व्हावा, अशी आग्रही मागणी शिक्षण तज्ज्ञांनी केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत ठेवून मसुदा तयार करण्यात आला असला, तरी त्यात सुधारणा करताना शिक्षक आणि पालकांच्या सूचना महत्त्वाच्या ठरतील, असे तज्ज्ञांचे मत आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर आणि शिक्षण विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाइन कट्ट्यात या मसुद्यावर चर्चा झाली. यात अभ्यासक्रम रचना, अध्यापन पद्धती इत्यादी मुद्द्यांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या मसुद्यातील अध्ययन निष्पत्ती स्पष्ट आणि सुटसुटीत आहेत. त्यामुळे शिक्षकांना अध्यापनाचे नेमके उद्दिष्ट समजेल, असे डॉ. माधव सूर्यवंशी यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार बदल करण्याची लवचिकता हा या मसुद्याचा गाभा असावा. त्यामुळे जनतेचा अभिप्राय महत्त्वाचा आहे, असे शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी शिक्षकांनी पाठ्यपुस्तकांबरोबरच मसुद्याचाही अभ्यास करावा आणि सुधारणा सुचवाव्यात, अशी अपेक्षा विशेष सल्लागार बसंती रॉय यांनी व्यक्त केली. हा मसुदा अभिप्रायासाठी खुला असून, अंतिम स्वरूप देताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचार होईल, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला. लेखननियमांचा सराव पाचवीपासून दहावीपर्यंत टप्प्याटप्प्याने असावा, असे मत तडफळे यांनी व्यक्त केले. मातृभाषा धोरणाला मसुद्यात प्राधान्य देण्यात आले असून भाषाशिक्षणासाठी सविस्तर मार्गदर्शन आहे, असे संपदा जोशी यांनी स्पष्ट केले.

# नांदूरनाका हाणामारीतील जखमी राहुल धोत्रेचा मृत्यू

## माजी नगरसेवक निमसे फरार, परिसरात तणाव

**नाशिक ।** आठ दिवसांपूर्वी नांदूर नाका येथे दोन गटांत झालेल्या रक्तरंजित हाणामारीत गंभीर जखमी झालेला राहुल धोत्रे (रा. नांदूरनाका) या युवकाचा शुक्रवारी (ता. २९) सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.



दुचाकीचे चाक पायावरून गेल्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर आठ दिवसांपूर्वी भयंकर हाणामारीत झाले होते. भाजपचे माजी नगरसेवक उद्धव निमसे यांचे समर्थक आणि आकाश धोत्रे यांच्यात झालेल्या या हाणामारीत राहुल धोत्रे याच्यावर धारदार हत्यारांनी वार करण्यात आला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने शुक्रवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला. या घटनेत आधी दाखल असलेल्या गुन्ह्यात आता बदल करून आरोपींवर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजी नगरसेवक उद्धव निमसे अजूनही फरार असून, त्यांना अटक करण्यासाठी पोलिस पथके रवाना झाल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पिसे यांनी दिली. दरम्यान, राहुल धोत्रे यांच्या मृत्यूनंतर जिल्हा रुग्णालयात पोस्टमार्टेमसाठी मृतदेह पाठवण्यात आला. मृत्यूची बातमी पसरताच नातेवाईक आणि मित्रपरिवाराने रुग्णालयासमोर मोठी गर्दी केली होती. निमसे यांना अटक करण्याच्या मागणीसाठी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांनी पोलिस आयुक्त व स्थानिक पोलिसांना निवेदने दिली आहेत. परिसरातील तणाव लक्षात घेऊन नांदूरनाका भागातील गणेश मंडळांचे मंडप, मृतकाच्या घराकडे जाणारा रस्ता तसेच निमसे यांच्या घराभोवती पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

## उद्धव निमसेंना अटक करण्याची उबाठाची मागणी

**नाशिक ।** नांदूर नाका परिसरात माजी नगरसेवक उद्धव निमसे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी प्राणघातक हल्ला करत दोघा युवकांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्राणघातक हल्ल्यातील सात संशयितांना अटक करण्यात आली असली तरी मुख्य संशयित आरोपी उद्धव निमसे फरार आहे. निमसे यांना अटक करून पीडितांच्या कुटुंबाला संरक्षण देण्याच्या मागणीबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदन देण्यात आले.



शुक्रवारी (दि.२२) संध्याकाळी सनी धोत्रे याचा निमसे गटातील दोन मुलांसोबत वाद झाला. यानंतर सनी धोत्रे, राहुल संजय धोत्रे, अजय कुसाळकर, शुभम तिडके आणि अल्ताफ शेख हे नांदूर नाका येथील मंदिराजवळ आले असता काही वेळातच पोलीस सनी धोत्रे आणि शुभम तिडके यांना तक्रारीसाठी पोलीस ठाण्यात घेऊन गेले होते. मात्र, या दरम्यान माजी नगरसेवक उद्धव निमसे घटनास्थळी दाखल झाल. `त्यांनी धोत्रेंना मारून टाका असे म्हटल्याने या टोळक्याने धोत्रे आणि कुसाळकर यांच्या घरावर हल्ला केला. कुसाळकर हा जीव वाचवून पळाला मात्र, त्याला टोळक्याने पकडून बेदम मारहाण केली. त्यानंतर राहुल धोत्रे याचा पाठलाग करीत संशयित आरोपींनी पकडून त्याला जवळच्या शेतात नेऊन गंभीर मारहाण केली. या मारहाणीमध्ये राहुल धोत्रे याच्या पोटातील कोथळा देखील बाहेर आला होता. हल्ल्यातील संशयित पवन निमसे, मेघराज जोजारे, गणेश निमसे, रोशन जगताप, अक्षय पगार, सुधीर उर्फ गोटीराम निमसे आणि सुमित हंडोरे हे सात आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून उर्वरित फरार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांची भेट घेत त्यांना जखमी झालेल्या व्यक्तींनी दिलेल्या फिर्यादीमध्ये उद्धव निमसे यांचे नाव स्पष्टपणे नमूद असून देखील अद्याप त्यांच्यावर ठोस कारवाई झालेली नाही, यावरून प्रशासनावर राजकीय दबाव असल्याचे दिसून येत असल्याचा आरोप दिलेल्या निवेदनात केला आहे. तसेच, फिर्यादीच्या कुटुंबावर सध्या राजकीय दबाव व गुंडांचा दबाव टाकण्यात येत आहे, त्यामुळे त्यांना तातडीने पोलीस संरक्षण देण्यात यावे. निवेदनातील मागण्या तात्काळ पूर्ण झाल्या नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

# नाशिक शहर पोलीस आयुक्तालयात सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ पारितोषिक वितरण सोहळा







**नाशिक ।** नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ पारितोषिक वितरण सोहळा काल (दि. २८) रोजी गंगापूर रोड येथील पोलीस आयुक्त कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यास विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम अध्यक्षस्थानी होते. आ. सरोज अहिरे, जिल्हाधिकारी जलज शर्मा आणि नाशिक शहराचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आदर्श गणेश मंडळांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. तसेच परिमंडळ-१ व परिमंडळ-२ मधील उत्कृष्ट मंडळांची निवड करणाऱ्या परीक्षक समितीच्या सदस्यांचा देखील सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास पोलीस उपआयुक्त किरणकुमार चव्हाण, मोनिका राऊत, किशोर काळे, चंद्रकांत खांडवी, सर्व सहायक पोलीस आयुक्त, पोलीस ठाण्यांचे व शाखांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार तसेच कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. तुषार पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांनी केले.

**● परिमंडळ-१ विजेते गणेश मंडळे, प्रथम क्रमांक : सरदार चौक मित्र मंडळ, पंचवटी, द्वितीय क्रमांक : श्री राजे छत्रपती सामाजिक, सांस्कृतिक कला, किडा मित्र मंडळ, जुनी तांबट लेन, भद्रकाली, तृतीय क्रमांक : विघ्नकर्ता मित्र मंडळ, राजपाल कॉलनी, पंचवटी ● उत्तेजनार्थ : न्यु स्फुर्ती लोणार लेन युवक मित्र मंडळ, रविवार कारंजा, सार्वजनिक वाचनालय, टिळकपथ नेहरू गार्डन, भद्रकाली ● परिमंडळ-२ विजेते गणेश मंडळे, प्रथम क्रमांक : श्री प्रतिष्ठान मित्र मंडळ, श्रद्धा विहार, वडाळा-पाथर्डी रोड, द्वितीय क्रमांक : आयएसपी-सीएनपी वेल्फेअर फंड कमिटी, नाशिकरोड ● तृतीय क्रमांक (संयुक्तपणे) : अमरज्योत मित्र मंडळ, सातपूर गाव, कपालेश्वर राजा मित्र मंडळ, उपनगर ● उत्तेजनार्थ : सातपूरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव समिती, सातपूर कॉलनी ● शिवयुवा प्रतिष्ठान सामाजिक संस्था, देवळाली कॅम्प**

# गोवंश कत्तलीप्रकरणी दोन जण जेरबंद, ८० किलो मांस जप्त

## मुंबईनाका पोलिसांची कारवाई

**नाशिक ।** नाशिक शहर व परिसरात गोवंशाची कत्तल व विक्रीच्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईनाका पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत दोन इसमांना ताब्यात घेऊन ८० किलो वजनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एक आरोपी फरार झाला आहे. दिनांक २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता राधे सोसायटी, सह्याद्री हॉस्पिटल मागे, फ्लॅट क्रमांक ०२ येथे गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. तत्काळ सापळा रचून पथकाने छापा टाकला असता हॉलमध्ये जनावरांची कत्तल करून ठेवलेले मांसाचे



तुकडे आढळले. घटनास्थळी तिघे इसम दिसले, मात्र त्यापैकी एक पोलीसांची चाहूल लागताच पसार झाला.तर अरबाज अस्लम कुरेशी (२८, रा. राधे सोसायटी, द्वारका नगरी, नाशिक),दानिश रफिक कुरेशी (३०, रा. म्हाडा बिल्डिंग, वडाळागाव, नाशिक) यांना ताब्यात घेतले आहे. शोएब समद कुरेशी (३४, रा. कसाईवाडा, वडाळानाका, नाशिक)हा फरार झाला आहे. असल्याचे उघड झाले. या कारवाईत १६ हजार रुपयांचे ८० किलो गोमांस पंचासमक्ष जप्त करण्यात आले असून मुंबईनाका पोलीस ठाण्यात प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा डी. टी. गाढवे करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, परिमंडळ-१ चे उपायुक्त मोनिका राऊत, सरकारवाडा विभागाचे सहायक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोश नरूटे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या पथकात सपोनि सुधीर पाटील, समद बेग, रोहीदास सोनार, पोहवा देविदास गाढवे, पोशि गणेश बोरणारे, दिपक जगदाळे, आकाश सोनवणे, नवनाथ उगले, समीर शेख, योगेश अपसुंदे, राजेंद्र नाकोडे आदींचा समावेश होता.

## नाशिकमधील देखाव्यांचे गणेश दर्शन- २०२५



राजे संभाजी सांस्कृतिक, कला व क्रीडा मंडळ प्रणित शांतिविनायक मित्र मंडळ व महाकाली सोशल ग्रुप गणेशोत्सव मंडळाने पवननगर मार्केटजवळ साकारलेले आद्य ज्योतिर्लिंग श्री महाकालेश्वर महादेवाचे ४० फुटी भव्य दिव्य शिल्प...





अशोक स्तंभांनजीक गंगापूर रस्त्यावर साई मित्र मंडळाने डोक्यात झणझणीत अंजन घालणारा प्रबोधनात्मक फलक देखावा. समवेत भगवान महादेवाचे उभारलेले भव्य पोस्टर



श्री फ्रेंड सर्कल पंचवटी मंडळाचे भव्यदिव्य मंदिर आणि मंदिरात विराजमान महाकाय गणेश मूर्ती...



लोणार लेन युवक मित्र मंडळाचा भव्यदिव्य 'नाशिकचा चिंतामणी' श्रीगणेश...

## उदोजी अर्ली स्कूलमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव

**नाशिक ।** उदोजी अर्ली स्कूल, नाशिक येथे गणेश चतुर्थी निमित्त पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या मातीच्या गणपतीच्या मूर्तींची शाळेच्या परिसरात प्रतिष्ठापना करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले आणि निसर्गाला हानी न करता सण साजरे करण्याचा संदेश देण्यात आला. या विशेष कार्यक्रमात मुख्याध्यापिका दीप्ती पटेल यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत गणेशोत्सवाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाची काळजी घेण्याचे महत्त्व पटवून देत सतत जागरूक राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी नैसर्गिक मातीचा वापर करून सुंदर आणि आकर्षक मूर्ती तयार केल्या, ज्या संपूर्णपणे पर्यावरणपूरक आहेत. या उपक्रमामुळे मुलांमध्ये सृजनशीलता, जबाबदारीची जाणीव आणि निसर्गप्रेम वृद्धिंगत झाले आहे. हा गणेशोत्सव केवळ धार्मिक सणापुरता मर्यादित न राहता, सामाजिक व पर्यावरणीय जागरूकता निर्माण करणारा ठरला.



शाळेच्या शिक्षकांनी सांगितले की, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्येही आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शिक्षक होण्याच्या स्वप्नाचा भंग

शिक्षक हा समाजाचा दीपस्तंभ मानला जातो. ज्ञान, संस्कार आणि मूल्यांचे संगोपन करणाऱ्या या व्यवसायाकडे लाखो तरुण मोठ्या आशेने पाहतात. महाराष्ट्रासारख्या शैक्षणिकदृष्ट्या प्रगत राज्यात तरुणांनी शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणे हे स्वाभाविकच आहे. मात्र गेल्या दोन-अडीच वर्षांपासून राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील भरतीप्रक्रिया अक्षरशः ठप्प आहे. आज होईल भरती, उद्या होईल भरती, महिन्याभरात होईल भरतीह्व अशा घोषणा केल्या जात आहेत, परंतु प्रत्यक्षात एकही ठोस निर्णय होताना दिसत नाही. ही केवळ प्रशासकीय ढिलाई नाही तर तरुणाईच्या भविष्याशी खेळलेली एक क्रूर थट्टा आहे.

------------

शासनाच्या घोषणांवर विश्वास ठेवून आपले वय, परिश्रम आणि स्वप्ने पणाला लावणाऱ्या हजारो तरुणांना आज वेदनादायी परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. भरती होणार, उद्या भरती होणार, महिनाभरात भरती जाहीर होणार, या केवळ घोषणांवर सरकारने तरुणांना आशेवर ठेवले आहे. परंतु आजवर प्रत्यक्षात काहीच झालेले नाही. म्हणूनच खरा संशोधनाचा प्रश्न असा आहे की, सरकारला नेमकी जाग कधी येणार?

दरवर्षी नेट परीक्षा दोनदा आणि सेट परीक्षा एकदा घेतली जाते. याशिवाय पी.एच.डी. धारकांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. म्हणजेच पात्र उमेदवारांची कमी नाही. तरी जागांची भरती अघोषित बंदीखाली ठेवण्यात आली आहे.

यामध्ये अनेक तरुणांचे वय वाढत चालले आहे. काही जण १५-२० वर्षांपासून तासिका तत्त्वावर काम करून स्वतःचे तारुण्य पणाला लावत आहेत. स्थिर नोकरी, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, वैद्यकीय सुविधा यापैकी काहीही न मिळता त्यांनी केवळ अध्यापनाच्या आवडीपायी जीवन व्यतीत करीत आहे. उद्या ते आहे त्या नोकरीवर राहतील की नाही, ही भिती त्यांना नेहमी असते. प्रश्न असा आहे की, या तरुणांचा विचार सरकार कधी करणार?

**प्रगतिशील महाराष्ट्राचे मागे पडलेले शिक्षण :**

कधीकाळी प्रगतिशीलतेचे प्रतीक मानले गेलेले महाराष्ट्राचे शिक्षणक्षेत्र आज अधोगतीच्या मार्गावर आहे. देशात आघाडीवर असलेले हे क्षेत्र आता मागे सरकत चालले आहे. याला कारण शासनाची शिक्षणाकडे बघण्याची असलेली नकारात्मक दृष्टी ही आहे.

सरकार तरुणांकडे रोजगार निर्मितीच्या दृष्टीने पाहत नाही. उलट तरुणांचा वापर फक्त धार्मिक कार्यक्रमांचे व्यवस्थापन, झेंडे हातात घेणे आणि राजकीय मेळाव्यांसाठी केला जातो. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतो,तरुणांना फक्त भक्त बनवायचे आहे का, की त्यांचे भविष्य घडवायचे आहे?

**शिक्षक भरती आणि तरुणांची वेदना :**

महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागात ५५ ते ६० टक्के जागा रिक्त आहेत. त्याच प्रमाणे २००४-०५ पासून शिक्षकेत्तर कर्मचारी भरती बंद असल्याचे नोंद आहे. तब्बल २० वर्षांपासून भरती न झाल्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागात हजारो पदे रिक्त आहेत.

तथापि, या जागांची भरती करण्याऐवजी शासन केवळ घोषणांची आतीषबाजी करत आहे. उदा.२०१४ मध्ये भाजप पक्षाने दरवर्षी दोन कोटी रोजगार संधी उपलब्ध करून देऊ, अशी

## घोषणांचा खेळखंडोबा की तरुणांची वेदना?

पूर्वार्ध

घोषणा केली होती, परंतु प्रत्यक्षात काहीच घडले नाही.

शिक्षण क्षेत्रात बदल घडवण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० लागू केले गेले आहे, परंतु त्याची अंमलबजावणी केवळ कागदावरच आहे. शासनाने या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पावले उचलली नाहीत, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रात सुधारणा होऊ शकलेली नाही.

**चुकीच्या योजनांना पैसा शिक्षणासाठी नाही :**

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील समस्यांमागे एक विरोधाभासपूर्ण धोरण स्पष्टपणे दिसून येते. शासनाकडे मोठ्या प्रमाणात आर्थिक साधने उपलब्ध असून, ती अनेक योजनांवर खर्च केली जातात, ज्या प्रत्यक्षात लोकांच्या जीवनावर फारसा परिणाम करत नाहीत.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय, अमरावती.
९३२६८७७७४९

उदा, भव्य जाहिराती, प्रचारात्मक मोहिमा किंवा सामाजिक कार्यक्रमांसाठी मोठा आर्थिक खर्च केला जातो, पण मानवी विकासाठी मुलभूत गरज असलेल्या शिक्षण क्षेत्र दुर्लक्षित आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मध्ये शिक्षण क्षेत्रासाठी जी ६% जीडीपी खर्च करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, ती भारताच्या शिक्षण व्यवस्थेच्या सुधारणा आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण मानली जाते. पण प्रत्यक्षात, या उद्दिष्टपर्यंत पोहोचण्याचे प्रमाण कमी आहे.

२०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पानुसार, भारतातील सार्वजनिक शिक्षण खर्च जीडीपीच्या २.९% इतका आहे, जो राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपी २०२० च्या ६% च्या उद्दिष्टापेक्षा खूपच कमी आहे. अर्थात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एनईपी २०२० मध्ये शिक्षणासाठी ६% जीडीपी खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरी, प्रत्यक्षात हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक पाऊले उचलली जात नाहीत ही दुर्दैवी बाब आहे.

विशेषतः शिक्षक भरतीसाठी किंवा तरुणांच्या रोजगार निर्मितीसाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद केली जात नाही. या परिस्थितीमुळे तरुणांच्या मनात असंतोष आणि संतापाची भावना निर्माण होते. जे तरुण वर्षानुवर्षे मेहनत करून पात्र ठरले आहेत, त्यांचे भविष्य अंधकारमय बनत आहे आणि त्यासाठी शासनाकडे आवश्यक साधने असूनही त्याचा उपयोग होत नाही.

हा विरोधाभास स्पष्ट करतो की शासनाची प्राथमिकता फक्त दृष्टीस पडणाऱ्या योजनांवर आहे, तर मुलभूत आणि दीर्घकालीन गरजा, शिक्षण, रोजगार, शाश्वत नोकऱ्या बाजूला ठेवण्यात येत आहेत. यामुळे तरुणांचा विश्वास सरकारवर कमी होत आहे आणि समाजातील असंतोष वाढतो आहे.

**राजकीय विसंगती**

महाराष्ट्रातील महायुती सरकार या शिक्षक भरतीच्या प्रश्नावर स्पष्ट आणि एकसंध भूमिका घेताना दिसत नाही. मुख्यमंत्री (भाजप) सांगतात की, भरती अंतिम टप्प्यात आहे, तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील (भाजप) लवकरच भरती सुरू होणार आहे, असे आश्वासन देतात. त्याच वेळी अर्थमंत्री अजित पवार (महायुतीचे घटक पक्ष नेते) जागा भरती प्रक्रियेवर बोलत नाही. उच्च पदस्थ कर्मचारी सांगतात की, फाईल अद्याप वित्त विभागाकडे अडकली आहे.

याचा अर्थ असा की, एकाच सत्तेत असलेले नेते शिक्षक भरतीसंदभार्तील महत्त्वाच्या निर्णयांवर एकमत साधू शकलेले नाहीत. प्रत्येकजण जबाबदारी दुस?्यावर ढकलत असल्याने भरती प्रक्रियेच्या ताणतणावाचा भार फक्त तरुणाईवर येतो. यामुळे ना केवळ शिक्षक उमेदवार गोंधळलेले आहेत, तर सर्वसामान्य नागरिकांच्या मनातही प्रश्न निर्माण झाला आहे.

एकाच आघाडीतील नेते असूनही, शिक्षक भरतीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर सरकार एकमत का करू शकत नाही? हा चिंतनाचा प्रश्न आहे. सत्तेत असूनही निर्णय न घेणे, जबाबदारी टाळणे आणि शासनाच्या धोरणात विसंगती ठेवणे हा फक्त प्रशासकीय अपयशाचा प्रश्न नाही. हे तरुणांच्या भवितव्याशी थेट खेळणाऱ्या राजकीय निर्णयांचा परिणाम आहे.

शिक्षक भरतीसाठी अपेक्षित ती त्वरित कारवाई न होणे आणि विविध राजकीय मतभेदांमुळे प्रक्रिया ठप्प पडणे, सामान्य जनता आणि पात्र उमेदवारांची आशा धूसर करते.

परिणामी, हजारो तरुण वर्षानुवर्षे मेहनत करून पात्र ठरले तरीही असुरक्षिततेच्या अधिवासात अडकले आहेत. त्यांचे स्वप्नभंग होतो आणि सामाजिक-सांस्कृतिक जीवनावरही परिणाम होतो. हा विषय राजकीय निर्णय, प्रशासनातील विसंगती आणि सामाजिक परिणाम या तिन्ही स्तरांवर गंभीर चिंतनाचा विषय बनतो.

**तरुणांचे जीवन: वेदनेचे चित्र**

महाराष्ट्रात शिक्षक भरतीच्या विलंबामुळे तरुणांचे जीवन आता गंभीर संकटात आले आहे. हा प्रश्न केवळ रोजगारापुरता मर्यादित नाही. त्याचे सामाजिक, मानसिक आणि शैक्षणिक परिणाम दीर्घकालीन स्वरूपाचे आहेत. वर्षानुवर्षे अभ्यास करून आणि पात्र ठरून देखील भरती न झाल्यामुळे अनेक तरुण खचून जात आहेत.

त्यांच्या मेहनतीचे आणि शिक्षणाचे फळ मिळण्याची शाश्वती राहिलेली नाही. ही मानसिक दडपणाची अवस्था त्यांचा आत्मविश्वास कमी करते आणि भविष्यासंबंधी असुरक्षितता निर्माण करते. एकीकडे उच्च शिक्षण घेत असतांना २५ ते २६ वर्ष लागतात.

दुसरीकडे स्थिर नोकरी न मिळाल्यामुळे तरुणांच्या वैवाहिक जीवनावरही परिणाम होत आहे. अनेक तरुण विवाहाच्या योग्य वयात स्थिर आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा मिळवू शकत नाहीत, ज्यामुळे त्यांचे वैवाहिक आणि भविष्यातील योजनांमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत.

नोकरीसंबंधी असुरक्षिततेमुळे तरुणांमध्ये नैराश्य, चिंता आणि आत्मविश्वासाचा अभाव वाढत आहे. सततच्या अनिश्चिततेमुळे त्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर नकारात्मक परिणाम होत असून, समाजात निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

रिक्त पदांमुळे महाविद्यालयांत दर्जेदार अध्यापन होत नाही. शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळत नाही, अभ्यासक्रम पूर्णपणे आकलन होण्याची शक्यता कमी होते, त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता घटते.

यातून स्पष्ट होते की शिक्षक भरतीच्या विलंबामुळे तरुणांचे संपूर्ण जीवनच प्रभावित होत आहे. त्यांच्या स्वप्नांची थोडीशीही पूर्तता होत नाही, सामाजिक आणि कौटुंबिक जीवनावर परिणाम होतो, आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होतो. ही स्थिती तातडीने सुधारण्याची आवश्यकता आहे.

**आकडेवारी आणि वास्तव**

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्र सध्या गंभीर संकटातून जात आहे. राज्यात सुमारे १५ राज्य विद्यापीठे आणि ५०० पेक्षा जास्त महाविद्यालये कार्यरत आहेत. दरवर्षी हजारो शिक्षक निवृत्त होतात. तसेच नवीन अभ्यासक्रम सुरू होतात, ज्यामुळे हजारो पदे रिक्त राहतात.

या रिक्त पदांच्या भरतीसंबंधी प्रत्यक्ष काहीही घडलेले नाही. सरकारकडून फक्त घोषणा होत राहिल्या, पण त्या कागदी राहिल्या. ही आकडेवारी स्पष्ट करते की, राज्याच्या उच्च शिक्षण धोरणात दांभिकपणा आणि कार्यक्षमतेचा अभाव आहे. प्रत्यक्ष गरज आणि धोरणातील घोषणांमध्ये मोठा अंतर असल्यामुळे तरुण अभ्यासक आणि शिक्षक वर्गाच्या भवितव्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. जर तात्काळ भरती प्रक्रिया सुरळीत केली नाही, तर उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर दीर्घकालीन परिणाम होतील, तसेच शिक्षक वर्गातील असंतोष वाढेल, ज्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवरही होईल.

--------------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

■ ■ ■

# भटक्या कुत्र्यांची दहशत कायम

भटक्या कुत्र्यांचा धुडगूस केवळ मुंबई, दिल्लीपुरताच मर्यादित नाही तर देशातील प्रत्येक लहान मोठया शहरात त्यांच्या फौजेने जनतेला हैराण केले आहे.

भटक्या कुत्र्यांना वेळीच आवरा, त्यांची रवानगी श्वान आश्रमात करा, त्यांचे प्रजोत्पादन नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी ठोस उपाय योजा असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात कितपत ते शक्य आहे? लाखो भटक्या कुत्र्यांना पकडून सरकारी निवाऱ्यात एकत्र ठेवणे, त्यांना खाणे पिणे देणे, त्यांना औषधोपचार पुरवणे, त्यांना शी शू साठी फिरायला नेणे हे शक्य आहे का?

एवढे मनुष्यबळ व त्यांना संभाळण्यासाठी एवढा मोठा निधी आहे का? त्यांना संभाळायचे झाले तर तो खर्च कोण देणार? देशाच्या राजधानीत भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी महापालिका प्रशासनाचे पथक जाळ्या घेऊन आले तेव्हा दिल्लीत काही ठिकाणी श्वानप्रेमींनी त्यांना विरोध करून पिटाळून लावले. मग भटक्या कुत्र्यांना पकडणार तरी कसे?



स्टेटलाईन
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

लहान- मोठ्या शहरात आजही रात्री अपरात्री रस्त्यावरून चालताना किंवा घरी परताना चोर, लुटारू, दारूडे आणि भटक्या कुत्र्यांची भिती वाटते. रस्त्यावरून रात्री उशीरा किंवा पहाटे चालताना कुठून कुत्री भुंकतील व आपल्या दिशेने धावत येऊन हल्ला करतील याची शाश्वती नसते.

रस्त्यावर भुंकणारे कुत्रे कधी एकटे नसते तर त्याच्या आजुबाजुला त्याच्या सवंगड्यांची फौज असते. एकट्या मुलावर किंवा महिलेवर हल्ला करून त्यांचा चावा घेणाऱ्या भटक्या कुत्र्यांचे अनेक व्हिडिओ गेल्या काही दिवसांत सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत. पण आपल्या देशात श्वानप्रेमींची संख्याही खूप मोठी आहे.

पाळलेल्या कुत्र्याला ते घरातील मुलाप्रमाणे संभाळतात पण रस्त्यावरच्या त्या मुक्या प्राण्याबद्दलही त्यांना मोठी सहानभुती असते. म्हणनूच रोज सकाळी त्यांना रस्त्यावर जाऊन दूध- बिस्किट देणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना श्वानप्रेमी खायला प्यायला देतात पण त्यांची जबाबदारी मात्र घेण्याचे टाळतात. एवढेच नव्हे तर त्यांना पकडण्यासाठी आलेल्या पथकाला काही विरोधही करतात.

राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांची समस्या खूप वाढली आहे. यावर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्यात दिल्लीतील ६५ हजार भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यात आली. दिल्लीप्रमाणे महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, वसई, विरार, पनवेल, उरण, अंबरनाथ, बदलापर, नवी मुंबईतही भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे.

मुंबईच्या उपनगरात उंच निवासी इमारतींच्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा मोठ्या संख्येने ठिय्या दिसून येतो. कुत्र्यांच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी नसबंदीची मोहीम गेले कित्येक वर्षे राज्याराज्यांत राबवली जात आहे, पण त्यांची संख्या वेगाने वाढत आहे, हे या मोहीमेचे अपयश आहे.

भटक्या कुत्र्यांपेक्षा माणासाचा जीव महत्वाचा आहे असे सर्वोच्च न्यायालयाला सांगण्याची वेळ येतेच कशाला? श्वानप्रेमींच्या विरोधामुळे आणि पेटा या आंतरराष्ट्रीय संस्थेने दाद मागितल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला आपल्या निर्णयात सुधारणा करावी लागली. ११ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांना पकडून श्वान आश्रमात ठेवा असा निर्णय दिला होता, तर बावीस ऑगस्टला भटक्या कुत्र्यांवर नसबंदी करा, लसीकरणानंतर त्यांना त्याच जागेवर सोडा असा निकाल दिला. जी कुत्री आक्रमक व धोकादायक आहेत, त्यांना पकडून श्वान आश्रमात ठेवा असेही म्हटले आहे.

रस्त्यावर कुत्र्यांना खायला घालायला मनाई करण्यात आली आहे, कुत्र्यांना खायला घालण्यासाठी ठराविक जागा निर्माण करावी, असे न्यायालयाने म्हटले आहे. पण हा आदेश व्यवहारात कठोर पाळला जाईल का? भटकी कुत्री धोकादायक कोणती हे आता शोधायची नवीन जबाबदारी महापालिकांवर पडली आहे.

परदेशात रस्त्यावर भटकी कुत्री दिसत नाहीत. तिथे भटक्या कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रात पाठवले जाते मात्र भारतात भटक्या कुत्र्यांना पकडले जाऊ नये यासाठी पेटाने महागडे वकील देऊन सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. पेटाचे मुख्यालय अमेरिकेत आहे, तेथे रस्त्यावर भटकी कुत्री दिसत नाहीत. मात्र पेटा भारतात भटक्या कुत्र्यांसाठी न्यायालयात लढते हे अजब आहे.


रेबीज लस मेडिकलमधे खूप महाग असते पण सरकारी इस्पितळात ती मोफत मिळते कारण सरकार ती विकत घेते. कुत्र्यांसाठी लस बनविणाऱ्या जगात १८ कंपन्या आहेत , भारतात एकच कंपनी आहे. जर भटक्या कुत्र्यांची संख्या संपुष्टात आली तर त्यांच्यावर नसबंदी करण्यासाठी लस निर्माण करणाऱ्या कंपन्यांचे काय होईल? नसबंदी करण्यासाठी लस बनिवणाऱ्या कंपन्या, प्रशासनातील हितसंबंधी आणि श्वान प्रेमी आणि पेटासारख्या संस्था यांच्या दबावामुळेच भटक्या कुत्र्यांना देशात अभय मिळत आहे.

१९६६ मधे चेन्नईमधे देशात सर्वप्रथम कुत्र्यांची नसबंदी करणारी तीन केंद्रे सुरू झाली. सन २००१ मधे राष्ट्रीय पातळीवर हा कार्यक्रम राबिवण्यास सुरूवात झाली. इतक्या वर्षात देशात भटक्या कुत्र्यांची संख्या नेमकी किती वाढली आहे? किती कुत्र्यांवर नसबंदी झाली आहे? प्रजोत्पादन किती नियंत्रणाखाली आले आहे? याची निश्चित आकडेवारी आजही उपलब्ध नाही.

गेल्या अकरा वर्षात मुंबईत भटक्या कुत्र्यांची संख्या कित्येक लाखांनी वाढली. या कालावधीत भटक्या कुत्र्यांनी बारा लाखाहून अधिक मुंबईकरांचा चावा घेतला आहे. मुंबई महापालिका भटक्या कुत्र्यांवर नसबंधी मोहीम राबवत असली तरी त्यातून समस्या संपुष्टात येत नाही. सन २००९ ते २०२४ या काळात भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुंबई महापालिकेने चोवीस कोटी पेक्षा जास्त खर्च केले आहेत. आपल्या मतदारसंघात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झालेला आहे, त्यांना आवरा, अशा तक्रारी स्थानिक आमदार व माजी नगरसेवकांकडून वारंवार प्रशासनाकडे केल्या जातात. नवी मुंबईलाही भटक्या कुत्र्यांच्या समस्यांनी ग्रासले आहे. दीघा, ऐरोली, घणसोली या भागात तर भटक्या कुत्र्यांचा वर्षानुवर्षे रस्त्यांवर धुडगूस चालू आहे. रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांवर नसबंदीची मोहीम प्रभावीपणे राबविणे हाच त्यावर उपाय आहे. भटक्या कुत्र्यांना पकडून कुठे एकत्र ठेवले व त्यांनी एकसाथ भुंकणे सुरू केले तर त्यातून नव्या समस्या सुरू होतील. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची काटेकोर अमलबजावणी करणे ही प्रशासनाची तारेवरची कसरत आहे.

■ ■ ■

# तुझसे नाराज नही जिंदगी हैरान हुं मै...



भारतातील एक कवी, गीतकार, हिंदी चित्रपट दिग्दर्शक, निमार्ते , विविध पुरस्काराने सन्मानित मनोरंजनासह गंभीर विषय हाताळत समाजाला हृदयस्पर्षी प्रबोधन करणारे प्रतिभावान साहित्यीक शब्दांचा जादूगार, भावनांचा शिल्पकार, गुलजार यांचा ९० वा वाढदिवस नुकताच साजरा झाला .

जीवनाच्या प्रत्येक वळणावर एखादी ओळ साथ देते, एखादा शब्द डोळ्यांत पाणी आणतो, तर एखादी प्रतिमा हृदय हलके करून जाते.ही जादू निर्माण करणारे नाव म्हणजेच गुलजार.

गीतकार म्हणून त्यांनी मोरा गोरा अंग लैले... पासून ते जय हो... पर्यंत रसिकांच्या भावना शब्दांत बंदिस्त केल्या. दिग्दर्शक म्हणून कोशिश, आंधी, माचिस, इजाजत अशा अनेक चित्रपटांतून जीवनाचे खोल प्रश्न पडद्यावर आणले. साहित्यिक म्हणून त्यांनी कविता, अनुवाद आणि लघुकथांमधून समाजाला संवेदनशीलतेची नवी दिशा दिली.

'मेरे अपने' मध्ये तरूणांना हिंसक शत्रूपणाचे निरपराधावरील दुष्परिणाम, हिंसा हि वाईटच चा संदेश, 'कोशीश' मध्ये मुक्या-बहिरे प्रेमीयुगुलाचे जिवांची प्रत्यक्ष संसारात येणारे दुःख व होणारी घालमेल.' माचीस' मध्ये अत्याचाराविरुद्ध लढणारी स्त्री, शेक्सपिअरचे नाटकावर आधारित 'अंगुर' मधील विनोदी डबलरोल धमाका, 'आंधी' मधील पतिपत्नीत दुरावानंतर कालांतराने भेटीत उफाळून येणारी पण समाज भितीने अव्यक्त प्रेमाची व्याकुळता इत्यादी मनाला भिडणाऱ्या कलाकृतीचे दर्शन गुलजार यांनी प्रेक्षकांना घडविले.

'मासूम' मधील 'तुझसे नाराज नही जिंदगी हैरान हु मै' या गाण्यातील भाव मानवी मनाशी एकरूप झाल्याशिवाय राहत नाही . गुलजार यांचे प्रत्येक गीत अशा प्रतिमांनी पुरेपूर व हृदयंगम झाले आहे.



गुलजार यांनी चित्रपट क्षेत्राशिवाय साहित्यिक क्षेत्रात कवी कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर अशा साहित्यकारांचे मराठी काव्य हिंदी, ऊर्दु भाषेत अनुवादित करून वाहवा मिळवली आहे.

सन २०१६ ला पिंपरी (पुणे) येथे आयोजित ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांनी आपल्या भाषणात ह्या बाबींचा आवर्जून उल्लेख केला व साहित्यीक क्षेत्रात मिल्टन, शेक्सपिअर ला जसे स्थान दिल्या गेले तसे कालिदासाच्या रचनांची दखल न घेतल्याबद्दल खंतही व्यक्त केली.

अशा ह्या हर हुन्नरी महान साहित्यिकास चित्रपटातील पटकथा, गीते, निर्मिती, दिग्दर्शकाचे कलाकृतीसाठी अनेक फिल्म फेअर अवार्ड १९७७, २०११, २०१३, २०१९ ला विविध चित्रपटासाठी आतापर्यंत एकुण ३६ पुरस्कार मिळालेला हा एकमेव कलावंत.

सन २००४ ला भारतातील सर्वोच्च ' पद्मभुषण ' सह सन २००७ ला हॉलीवुड फिल्म ऑस्कर पुरस्कार 'जय हो' या स्लमडॉग मिलेनिअर या गीताच्या लेखनासाठी ग्रॅमी अवार्ड तर सन २०१३ ला दादासाहेब फाळके हा सिने सृष्टीतील सर्वोच्च पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

लोकांना मेल्यानंतर वाचलं जात, पण गुलजार यांनी प्रत्येक भावनेला न्याय देऊन स्वतःच्या अंतरंगात पाहायला लोकांना शिकवलं.

या बहुआयामी कलाकाराचा ९ दशकांचा प्रदीर्घ प्रवास, असंख्य सन्मान, अमाप लोकप्रियता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रसिकांच्या हृदयात मिळवलेले स्थान, हेच त्यांचे खरे यश.

वा. पां. जाधव
अमरावती

गुलजार म्हणजे शब्दांत मावलेला निसर्ग, सुरांत दडलेली व्याकुळता, कवितेत उमललेले प्रेम, आणि पडद्यावर साकारलेले वास्तव. त्यांची प्रत्येक कलाकृती मनाला नवा विचार, नवा अनुभव आणि नवी दिशा देत राहते. त्यांची लेखणी असाच सुवर्ण प्रवाह वाहत राहो, आणि आपल्याला भावविश्व अधिक समृद्ध करत राहो. या अनमोल कलाकारास शुभेच्छा.....

■ ■ ■

## भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शक क्रीडाक्षेत्र

वाचक लिहितात

आंतरराष्ट्रीय खेळांच्या स्पर्धांमध्ये एकल क्रीडा प्रकाराला डिसिप्लिन असे म्हणतात. डिसिप्लिन या इंग्रजी शब्दाचा अर्थ शिस्त असा आहे म्हणूनच खेळात शिस्त, संघ भावना, एकात्मता, देशाभिमान व शारीरिक, मानसिक तंदुरुस्ती मिळते.

ऑनलाइन गेम मुळे हे सर्व नष्ट होत चालले आहे त्याच्यावर नियंत्रण आणणे आणि प्रत्येकाला मेहनत करून उत्कृष्ट खेळाडू बनविणे हे काम सरकारचे आहे व सरकार त्या प्रमाणे काम करत आहे. याचाच एक भाग म्हणून देशांतर्गत विविध ठिकाणी खेलो इंडिया च्या नावाने विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात येत आहे.

त्याचा परिणाम असा आहे की आज अनेक खेळाडू लहान मोठ्या शहरातून पुढे येऊन ऑलिंपिक, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन देशासाठी पदक मिळवत आहे.

गेल्या काही वर्षापासून क्रीडाक्षेत्र पैसे कमविण्याचे एक महत्त्वाचे साधन झाले असल्याचे क्रिकेटमधील आय.पी.एल व कबड्डीतील प्रो लीग्स मधून दिसून येते. त्यामुळेच अनेक राजकारणी क्रीडा क्षेत्रात आले आहेत. पैशापासून सत्ता आणि सत्तेपासून पैसा कमावणे हेच ज्यांचे ध्येय असते असे राजकारणी लोक विविध क्रीडा संस्थांच्या माध्यमातून पैसे कमावून भ्रष्टाचार करत आहे.

जो पैसा देईल त्या खेळाडूची निवड भारतीय संघात निवड केली जाते त्यावेळी त्याचे खेळातील कौशल्य पाहिले जात नाही. तसेच क्षेत्रीय आरक्षणाच्या मुळे गावागावातील उत्कृष्ट खेळाडू हे पुढे येत नाही.

क्रीडा क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार, गैरव्यवहार, खेळ आणि खेळाडू यात केले जाणारे राजकारण, अफरातफर या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ लागू केला आहे.

या विधेयकातील प्रावधानानुसार सर्व क्रीडा महासंघांना त्यांचा आर्थिक हिशोब तसेच निवड प्रक्रिया आदी गोष्टी सार्वजनिक कराव्या लागणार आहे. केवळ खेळ आणि पैसा कमावणे यासाठी नव्हे तर खेळाडूंच्या कल्याणासाठी विचार करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने काही प्रावधान ने बंधनकारक आहे. क्रीडा क्षेत्रातील संघटनांवर देखरेख ठेवण्यात येईल.

क्रीडा क्षेत्रातील गैरप्रकार उदाहरणार्थ डोपिंग, मॅच फिक्सिंग छळवणूक किंवा लैंगिक शोषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करता येईल. महिला आणि अपंग खेळाडूंसाठी विशेष प्राधान्य दिले आहे.

या सवार्मुळे क्रीडाक्षेत्र पारदर्शक होईल कारण त्याच्याशी संलग्न असलेल्या संस्थांचा स्वतंत्र कारभार संपला असून त्यांना सरकारच्या नियंत्रणात राहावे लागणार आहे. निवड प्रक्रियेतील भ्रष्टाचार थांबून प्रतिभावंत आणि खेळाडू नाव कमविण्याची संधी मिळेल. या विधेयकामुळे क्रीडा प्रशासनात पारदर्शकता व निष्पक्षता येईल.

राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनल, आचारसंहिता, सुरक्षित क्रीडा धोरण आणि तक्रार निवारण यंत्रणेत सर्व भागधारकांचे म्हणणे ऐकले जाईल तसेच त्यांचा आदर केला जाईल. वर्ष २०३६ मध्ये भारतात ऑलिंपिक स्पधेर्चे आयोजन करण्याचा विचार आहे या विधेयकाच्या साह्याने ते स्वप्न पूर्ण होऊ शकते.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

# चपातीला तूप लावून खाल्ल्याने बरे होतात अनेक आजार



अनेकांना तूप आवडतं. डाळ-भातावर तूप घालून खायला आवडतं तर काहींनी चपातीला किंवा रोटीला तूप लावून खायला आवडतं. पण तूप-रोटी किंवा चपाती खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने गुणकारी मानलं जातं. आजकाल जेव्हा प्रत्येकजण फिटनेस आणि डाएटिंगचा विचार करताना दिसतो. पण अवनेकांच्या डाएटमध्ये तूप हे असतंच असतं. पण रोज तूप घालून रोटी खाणे खरोखर आरोग्यदायी आहे का?

**तूप आणि चपाती खाल्ल्याने कोणते आजार बरे होतात?**

**१. पचन सुधारते :** तूप पचनसंस्था सुधारते. जेव्हा तुपासोबत रोटी खाता तेव्हा रोटीतील फायबर आणि कार्बोहायड्रेट्स सहज पचतात. त्यामुळे पोट हलके राहते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

**२. शरीराला त्वरित ऊर्जा देते**

तुपामध्ये असलेले चांगले फॅट्स आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड शरीराला त्वरित ऊर्जा देतात. कधीकाळी शेतकरी आणि मजूर सकाळी तूप लावून भाकरी खाऊन दिवसभर काम करायचे

**३. मेंदू आणि त्वचेसाठी फायदेशीर :** तुपामध्ये असलेले जीवनसत्त्वे अ, ड, ई आणि के मेंदूची वाढ, दृष्टी, त्वचेची चमक आणि केसांची ताकद वाढवतात. तुमच्या आहारात त्यांचा समावेश केल्याने तुम्हाला एकाच वेळी एकच नाही तर अनेक फायदे मिळतात.

**४. वजन नियंत्रणात उपयुक्त :** योग्य प्रमाणात तूप खाल्ल्याने चयापचय वाढते. चयापचय चांगले असताना शरीरात चरबी साठत नाही आणि वजनही नियंत्रणात राहते. योग्य प्रमाणात तूप सेवन केल्यास लठ्ठपणासारख्या समस्या उद्भवत नाहीत.

**५. हृदयाचे आरोग्य सुधारते :** जर तुम्ही शुद्ध देशी गायीचे तूप खाल्ले तर ते तुमच्या हृदयासाठी फायदेशीर ठरू शकते. त्यात असलेले उछअ (कंजुगेटेड लिनोलिक ॲसिड) रक्तदाब आणि कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते.

**६. रोगप्रतिकारक शक्ती वाढवते :** तुपामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. नियमित तुपाच्या सेवनाने आजार दूर राहतात आणि शरीर मजबूत होते. यामुळे अनेक आजार शरीरापासून दूर राहतात.

**तूप खाताना काय काळजी घ्यावी?**

जर शारीरिक हालचाल कमी असेल आणि तुम्ही जास्त तूप खाल्ले तर वजन वाढणे निश्चित आहे. तूपात कॅलरीज जास्त असतात ज्यामुळे चरबी वाढते. जास्त तूप खाल्ल्याने रक्तातील वाईट कोलेस्टेरॉल वाढू शकते, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. मधुमेह आणि रक्तदाबाच्या रुग्णांनी मर्यादित प्रमाणात तूप सेवन करावे, अन्यथा आरोग्याच्या समस्या वाढू शकतात.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### शेगावीचा राणा

निःस्वार्थ श्रध्देने जो
होतो श्री चरणी लीन
त्यांची इडापिडा टाळण्या
तत्पर संत गजानन राणा ..!

समाधिस्त झाले जरी
भाविकांना येते प्रचीती
उगीच का संत नगरीला
होते भक्तांची तोबा गर्दी ?

अध्यात्म विज्ञान सेवेचा
अप्रतिम संगम आहे इथे
असे निष्कलंक संस्थान
जगात आहे कां कुठे?




**भिवंडी, दि. २९ : प्रतिनिधी**

शहरात अवजड वाहनांना बंदी घातली असली तरी शहरा लगतच्या राज्य व राष्ट्रीय महामार्गांवर होणाऱ्या वाहतूक कोंडीने नागरिक हैराण झाले आहेत. भिवंडीतील वाहतूक कोंडीवर मार्ग काढावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित आमदार, खासदार,वाहतूक व पोलीस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत यावर उपाययोजना करण्याच्या सूचना व निर्देश वाहतूक पोलीस प्रशासनाला दिल्या होत्या. मात्र जिल्हाधिकाऱ्यांच्या या बैठकीनंतरही भिवंडीत वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका अजूनही झालेली नाही.शुक्रवारी अंजुर फाटा ते काल्हेर कशेळी पर्यंत प्रचंड वाहतूक कोंडी झालेली होती. तर पिंपळास मानकोली ते खारेगाव पर्यंत वाहतूक कोंडीने नागरिक हैराण झाले होते.भिवंडी ठाणे या एका तासाच्या प्रवासाला तीन ते चार तास लागत असल्याने येथील नागरिक व प्रवासी त्रस्त झाले आहेत.चौकट अंजुर फाटा येथील वाहतूक कोंडी ठरते डोकेदुखी - गुजरातवरून चिंचोटी खारबाव रस्त्यावरून अवजड वाहने अंजूर फाटा येथून मानकोली, राहनाळ ,काल्हेर व कशेळी येथे जात असल्याने अंजुर फाटा येथे सकाळी नऊ वाजल्यापासून प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. अंजुर फाटा हा शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात येत असल्याने येथील वाहतूक कोंडीचा फटका अंजुरफाटा येथील मनपाक्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांना बसत आहे. अंजुरफाटा येथे वाहतूक पोलिसांकडून अवजड वाहने थांबवून ठेवली जात असल्याने अंजुरफाटा येथे दिवसभर वाहतूक कोंडी झालेली असते.येथील वाहतूक कोंडी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

# इमारत दुर्घटनाबाधितांचे विरार येथील म्हाडा वसाहतीत पुनर्वसन

## मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती; 50 हजार रुपयांची मदतही जाहीर

**वसई, दि. २९ : प्रतिनिधी**

विरार पूर्वेकडील नारिंगी-विजयनगर येथील रमाबाई अपार्टमेंट इमारत दुर्घटनेत बाधित झालेल्या तब्बल ६० कुटुंबांचे पुनर्वसन विरार येथील म्हाडा वसाहतीत करण्यात यावे, असे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. या दुर्घटनेमुळे ६० कुटुंबे बेघर झालेली आहेत. त्यामुळे त्यांचे तात्पुरते पुनर्वसन म्हाडा वसाहतीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदर्भात प्रताप सरनाईक यांनी घटनास्थळावरून म्हाडाचे मुख्याधिकारी संजीव जायस्वाल यांच्याशी थेट संपर्क साधून म्हाडा इमारतीतील ६० घरे या कुटुंबांना तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून द्यावीत आणि तसेच या कार्यवाही संदर्भात महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांच्यासोबत समन्वय साधून तात्काळ या कार्यवाहीची अंमलजबावणी करावी, अशा सूचना केल्या आहेत.

ऐन गणेशोत्सवात या सर्वांवर दु:खाचे सावट पसरलेले आहे. त्यामुळे त्यांना तातडीची मदत म्हणून महापालिकेच्या वतीने ५० हजार रुपयांची मदत करण्याचे निर्देशही मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिका मुख्यालयात महापालिका, जिल्हाधिकारी प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून त्यांनाही याबाबतची माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला आणि तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. प्रसंगी ठाण्याच्या धर्तीवर वसई-विरार शहरात क्लस्टर योजना राबवली जावी आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या संदर्भात बैठक आयोजित केली जावी, अशी विनंती प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली.

शहरात यापुढे अनधिकृत बांधकामे होऊ नयेत. अनधिकृत बांधकामांना पाठिशी घालणाऱ्या



अधिकाऱ्यांवर कारवाई करा, असे निर्देश देतानाच वसई-विरार शहरातील शासकीय व अन्य जागांवर झालेल्या अनधिकृत बांधकामांचा सविस्तर माहिती सादर करण्याचेही निर्देश महापालिका आयुक्त मनोजकुमार सुर्यवंशी व जिल्हाधिकारी इंदुराणी जाखर यांना दिले.

वसई-विरार महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना थांबवण्यासाठी शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. ज्याप्रमाणे ठाणे महानगरपालिका हद्दीतील वागळे इस्टेटमधील किसननगर, कोपरी, कळवा, लोकमान्य नगर इत्यादी ठिकाणी सरकारने क्लस्टर योजना राबवली; तशाच पद्धतीने वसई-विरार महापालिका क्षेत्रात ही योजना राबवण्यात येईल व त्या माध्यमातून गोरगरीब जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

विरार पूर्व येथील इमारत दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विरार येथील दुर्घटनास्थळाला भेट दिली. तत्पूर्वी; त्यांनी प्रकृती हॉस्पिटलमध्ये दाखल जखमींची विचारपूस केली. त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी नारंगी येथील रमाबाई अपार्टमेंट ही चार मजली इमारत कोसळली; त्या घटनास्थळाला भेट दिली. तिथेही त्यांनी स्थानिक रहिवासी आणि दुर्घटनेमुळे बाधित झालेल्या व्यक्तींची भेट घेतली आणि महापालिका व जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपाययोजना तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत, या करता सरकार काय काळजी घेणार आहे, याची माहिती दिली.

ही इमारत कोसळली त्यामुळे संबंधित बांधकाम व्यावसायिकावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. परंतु शहरात आजही अनधिकृत बांधकामे सुरू आहेत, त्यामुळे त्या-त्या बांधकाम व्यावसायिकांवरही एमआरटीपी ॲक्ट अन्वये कारवाई करून त्यांनाही अटक करण्यात यावी, अशा सूचना प्रताप सरनाईक यांनी महापालिका व पोलीस आयुक्तांना दिल्या. या पाहणीनंतर प्रताप सरनाईक यांनी महपलिका मुख्यालयात घेतलेल्या आढावा बैठकीला खासदार डॉ. हेमंत सवरा, पालघरचे आमदार राजेंद्र गावित, आमदार राजन नाईक, महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, जिल्हाधिकारी इंदु राणी जाखर, तहसीलदार अविनाश कोष्टी आणि शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, मंत्री प्रताप सरनाईक यांच्या काही काळ आधी पालकमंत्री गणेश नाईक यांनीही विरारमध्ये दौरा करून जखमी कुटुंबियांची भेट घेऊन घटनास्थळाचीही पाहणी केली. यावेळी नाईक यांनी जखमींना आवश्यक ती सर्व मदत प्रशासनाकडून लवकरात लवकर पुरवली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच महापालिका मुख्यालयात एका आपत्कालीन बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना काही महत्त्वाचे आणि स्पष्ट निर्देश दिले. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देऊन ठोस पावले उचलावीत, असे त्यांनी बजावले.

# पिक ग्रामपंचायतीच्या बेबंदशाही कारभारावर लेखा परीक्षकांचे कडक ताशेरे

**पालघर, दि. २९ : प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील पिक- शिलोत्तर ग्रुप ग्रामपंचायतीमधे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची व बोगस बिलं बनवून सरपंच रविंद्र जोगवला यांनी लाखो रुपये लाटल्याची तक्रार एकूण ८ पैकी ६ सदस्यांनी लेखी निवेदनाने दि.२३/०६/२०२५ रोजी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्याकडे पुराव्यासह केली होती. या निवेदनाची दखल घेऊन दि.१८/०७/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहाय्यक संचालक , स्थानिक निधी लेखापरीक्षक, पालघर यांना या ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षण करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाचे पालन करून दि.७/८/२०२५ रोजी सहाय्यक संचालक स्थानिक निधी , लेखा परीक्षक, पालघर यांनी ४५ पानी सविस्तर अहवाल सादर केला आहे. या अहवालामधे ग्रामपंचायतीच्या बेबंदशाही कारभारावर कडक ताशेरे ओढले आहेत. त्याचबरोबर भ्रष्टाचार झाल्याचे ही सिद्ध झाल्याने आता सरपंच , व ग्रामसेवक यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे नोंदवावेत, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

लेखा अधिकाऱ्यांनी या संदर्भात ग्रामपंचायत सदस्यांना दि.२१/८/२०२५ रोजी लेखी पत्र दिले आहे. या पत्रामध्ये , "ग्रामपंचायतीच्या ' अनियमितता ' गंभीर असल्याचा गोपनीय अहवाल मुख्याधिकाऱ्यांना सादर केला आहे. ग्रामपंचायतीमधे सरपंचाने ग्रामसेवकाला हाताशी धरून कसा कारभार केला ? याबाबत सविस्तर वर्णन करून गंभीर ताशेरे ओढले आहेत. या अहवालामुळे ग्रामपंचायतीचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे काय कारवाई करतात याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. ग्रामपंचायतीने केलेली विकास कामे ही कायदेशीर व नियमानुसारच केलेली आहेत' असे म्हटले होते. लेखापरीक्षणामधे मात्र एकही काम नियामाने केलेले नाही, असे सरपंच रविंद्र जोगवला यांनी म्हटले आहे.

ग्रामपंचायत नियम २६(१) नुसार ग्रामपंचायतीने जमा खर्चाचे वार्षिक लेखे तसेच मत्ता व दायीत्व विवरणे तयार केलेली नाहीत. वित्तीय वर्षाअखेर बऱ्याच नोंदवह्या ग्रामपंचायतीने अद्यावत केलेल्या नाहीत. त्यामुळे जमा व खर्चाचा मेल बसत नाही. ग्रामपंचायतीने मासिक व वार्षिक लेखे समक्ष अधिकाऱ्याकडून प्रमाणीत करून घेणे आवश्यक असतानाही तसे केलेले नाही. ग्रामपंचायतीच्या स्व-उत्पन्नामधे घट झालेली आहे. तरतुदी शिवाय अधिक केलेल्या खर्चाला मान्यता घेतलेलेली नाही. ग्रामपंचायतीचा हिशोब प्रमाणीत न करताच खर्च केलेला आहे. ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांबाबत व केलेल्या व्यवहारांबाबत जिल्हा परिषदेला कळवलेले नाही. कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी बँक पासबुक ग्रामपंचायतीमधे उपलब्ध नाही. विकास कामे सुरू करताना स्थिती अहवाल व अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. परस्पर कामे सुरू केली आहेत. ग्रामपंचायतीच्या नियमांची पायमल्ली करून बिलं काढली आहेत. कंत्राटदाराकडून नियमानुसार निविदा न मागवताच कामे केलेली आहेत. खरेदी करताना निविदा व दरपत्रकांना मासिक सभेत मंजुरी न घेताच मनमानी पद्धतीने खरेदी केलेली आहे. त्यामधे ग्रामपंचायतीने



वित्तीय तत्त्वांचे पालन केलेले नाही, असा ठपका चौकशी अहवालात ठेवण्यात आला आहे.

विकास कामे करताना कंत्राटदाराची कुठलीही प्रमाणपत्र न घेता काम दिले गेले आहे. बिल काढताना बिलावर फक्त शाखा अभियंत्याच्याच सह्या आहेत. उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या सह्या घेतलेल्या नाहीत. विकास कामे करताना कुठल्याच नियमांचे पालन केलेले नाही. ग्रामपंचायतीने शासनाचेही आर्थिक नुकसान केले आहे.जी कामे ग्रामपंचायतीने कंत्राटदार (एजन्सी) म्हणून स्वतः घेतलेली आहेत तीच कामे त्यांनी स्वतः न करता पोट ठेकेदारांना नियमबाह्यरित्या दिलेली आहेत. ग्रामपंचायतीने ठेकेदारांच्या बिलामधून २% आयकर कपात केलेली आहे, मात्र ती शासन जमा केलेली नाही. उपकराची १% रक्कम वसूल करूनही ती शासन जमा केलेली नाही. कामगारांचा व कामाचा ०.५०% विमा रक्कम ही गहाळ झालेली आहे. कुठल्याच कामावर माहिती देणारे फलक लावलेले नाहीत. रोजगार हमी योजनेची कामेही नियमबाह्य पद्धतीने केलेली आहेत. त्यामुळे झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करून शासनाच्या निधीत जमा करण्यात यावा. पाणीपुरवठा निधी मधेही नियमबाह्य कामे केली आहेत. विकास कामे व विकास योजना राबवताना प्रशासकीय व तांत्रीक मान्यता घेणे बंधनकारक असताना देखील तांत्रिक मान्यता देखील घेतलेली नाही. ग्रामपंचायतीने केलेल्या खरेदीमधे नियमबाह्यरित्या काम झालेले आहे. ठेकेदाराकडून GST/TDS कपात केलेली आहे मात्र त्याबाबतचे प्रमाणपत्र ठेकेदारांना दिलेले नाही ,जमा रक्कम आयकर विभागाकडे जमा केलेला नाही, असा गंभीर ठपकाही ठेवण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीने छपाई केलेली वसुली पावती बुक या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली नाही. ही पुस्तके गटविकास अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करून घेतलेली नाहीत. त्यांचा गैरवापर झाला आहे. पावत्या देताना नियमबाह्यरीत्या दिल्या आहेत. वार्षिक जमा-खर्चाला ग्रामसभेमधे मान्यता घेतलेली नाही. पंचायत समिती अधिकाऱ्यांनी जमा-खर्चाची तपासणी केलेली नोंद कुठेही नाही. मासिक सभा व ग्रामसभा घेतल्या की नाहीत याची पडताळणी करता आलेली नाही. घरपट्टी , पाणीपट्टी व अन्य करांच्या जमा रकमा ७ दिवसांच्या आत मध्ये बँकेत जमा करणे आवश्यक असताना त्या परस्पर खर्च केल्या आहेत. अनामत रकमांमधे मोठा घोळ आहे. ग्रामपंचायतचे दप्तर पूर्णतः चुकीचे व नियमबाह्य आहे. हजेरी पत्रकांची नोंदवही नाही. स्वतः च्या नावाने काढलेले धनादेश बेकायदेशीर आहेत. बांधकाम मोजमाप पुस्तीकांचा साठा नोंदवही मधे नाही. आलेल्या निधीची नोंद नाही. पूर्ण वा अपूर्ण कामांची नोंद नाही. शिल्लक व बँक पासबुक यांचा मेळ लागत नाही. शासनाने अनुदान दिलेले असतानाही लाभार्थ्यांना लाभांपासून वंचित ठेवले आहे. ग्रामपंचायतीने तपासणीमधे अनेक कागदपत्रे दाखवलेली नाहीत त्यामुळे तपासणी करता आलेली नाही. संगणीकृत वार्षिक लेखे न ठेवल्याने प्रत्यक्षात जमा खर्चाचा संगणकीय आकडेवारीप्रमाणे असलेल्या जमा-खर्चाचा मेळ लागत नाही, अशी गंभीर निरीक्षणेही चौकशी अहवालाद नोंदवण्यात आली आहेत.

ग्रामपंचायतच्या भ्रष्टाचाराविरुद्ध ग्रामपंचायतीचे ८ पैकी ६ सदस्यांनी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार केली होती. त्यामध्ये कुंदन बबन पाटील, कल्पेश कोंडू लोखंडे, मनीषा दिगंबर पाटील, सुनंदा रामचंद्र पाटील ,रेखा रमेश पाटील व रवीना रवींद्र वाघ या सदस्यांचा समावेश होता. या सदस्यांनी केलेले सर्व आरोप लेखापरीक्षक अहवालामधे खरे ठरले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेने मुख्य कार्यकारी अधिकारी सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्यावर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुख्य सचिव राजेश कुमार यांना तीन महिने मुदतवाढ



**मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांना मुख्य सचिव पदावर तीन महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीसाठी ही मुदतवाढ असेल. याबाबतचे आदेश केंद्र सरकारकडून सामान्य प्रशासन विभागाला प्राप्त झाले आहेत. राज्य शासनाने तीन महिने मुदतवाढ देऊन राज्याची ध्येय-धोरणे पुढे राबविण्याची संधी दिल्याबद्दल मुख्य सचिवांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य शासनाचे आभार मानले आहेत.


## आज का अंदाज

शनिवार ३० ऑगस्ट २०२५

**पत्थर फोड एकच**

कल्याण बाजार

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ |
| २४५ | १३० | ६९० | ३५० |
| ५६० | २४८ | ७८० | २६० |
| ४७० | ३३८ | ५०० | १७० |
| १२ | ४२ | ५७ | ८७ |
| १६ | ४६ | ५९ | ८९ |
| १० | ४० | ५३ | ८३ |

**३० ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ६२ | ९१ | ०१ |
| ३८ | ६८ | ९७ | ०७ |
| ३४ | ६४ | ९५ | ०५ |
| १२० | १७८ | २३४ | १२७ |
| २४७ | ३५८ | ४५० | २८० |
| ६७० | २७७ | ३६० | ५६९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## अदाणी पोर्टफोलिओची विक्रमी कामगिरी; टीटीएम ईबीआयटीडीएने ९0,000 कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला

**अहमदाबाद, २९ ऑगस्ट :** भारतातील सर्वात मोठी पायाभूत सुविधा क्षेत्रातील कंपनी असलेल्या अदाणी ग्रुपने आज आपल्या पोर्टफोलिओचा मागील बारा महिन्यांचा (टीटीएम) आणि आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीचा आर्थिक अहवाल तसेच क्रेडिट कामगिरीची घोषणा केली.

अदाणी पोर्टफोलिओचा ईबीआयटीडीए पहिल्यांदाच मागील १२ महिन्यांच्या आधारावर ९0000 कोटी रुपयांचा टप्पा पार करत विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. पहिल्या तिमाही मधील ईबीआयटीडीए देखील सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला आहे. ही मजबूत कामगिरी मुख्यत्वे नव्याने वाढणाऱ्या व्यवसायांमुळे (विशेषतः एईएल अंतर्गत विमानतळ प्रकल्प), तसेच अदाणी ग्रीन एनर्जी, अदाणी एनर्जी सोल्यूशन्स, अदाणी पोर्ट्स अँड सेझ आणि अंबुजा सिमेंट्स यांच्या सातत्यपूर्ण वाढीमुळे शक्य झाली. या व्यवसायांतील भक्कम वाढीमुळे एईएलच्या विद्यमान व्यवसायातील घट भरून निघाली. एईएलच्या विद्यमान व्यवसायातील घट प्रामुख्याने व्यापारी व्यवहाराच्या प्रमाणात घट आणि आयआरएम (इंटिग्रेटेड रिसोर्स मॅनेजमेंट) मधील निर्देशांक किमतीतील अस्थिरतेमुळे झाली आहे. ईबीआयटीडीएमधील सातत्यपूर्ण वाढ ही दरवर्षी नियोजित १.५ ते १.६ लाख कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाला मजबूत आधार देत आहे.

क्रेडिटच्या दृष्टीने पाहता, पोर्टफोलिओचा लेव्हरेज २.६ पट इतका आहे, जो जागतिक स्तरावर सर्वात कमी मानल्या जाणाऱ्या पातळींपैकी एक आहे. तसेच ५३८४३ कोटींची उच्च तरलता रोख स्वरूपात कायम ठेवण्यात आली आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुमचे धाडस आणि शौर्य शत्रूंना घाबरवेल. तुम्हाला एका महत्त्वाच्या कामाचे नेतृत्व करण्याची संधी मिळेल. प्रगतीसह व्यवसायाचा विस्तार होईल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल.

**वृषभ :** अनावश्यक वाद टाळा. काही महत्त्वाच्या कामात अनावश्यक विलंब झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. व्यवसायात तुम्हाला अचानक आर्थिक फायदा होऊ शकतो. विरोधकांपासून सावध राहा.

**मिथुन :** आधीच नियोजित कामात यश मिळण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी असंतोषाची परिस्थिती निर्माण होऊ देऊ नका. राजकारणात तुमचे स्थान आणि प्रतिष्ठा वाढेल. अडकलेली कामं पूर्ण होतील.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी कठोर परिश्रम केल्याने नफा आणि प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. जमीन आणि इमारत खरेदी करताना काळजी घ्या. घाईघाईत निर्णय घेऊ नका.

**सिंह :** आज व्यवसायात प्रगती आणि नफा होईल. काही महत्त्वाच्या कामात तुम्हाला यश मिळेल. घराशी संबंधित समस्या सोडवल्या जातील. नोकरीत बढतीसह आर्थिक लाभ होईल.

**कन्या :** आज कामाच्या ठिकाणी निरर्थक वाद टाळा. सहकाजयासोबत समन्वयाने वागा. तुमच्या व्यवसायाकडे अधिक लक्ष द्या. तुम्हाला व्यावसायिक मित्राकडून पाठिंबा आणि साथ मिळेल.

**तुळ :** आज तुम्हाला आध्यात्मिक क्षेत्रातील एका खास व्यक्तीचा पाठिंबा आणि संगत मिळेल. तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. व्यवसायात तुमच्या वडिलांचा पाठिंबा आणि संगत मिळेल.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही आधी प्रलंबित कामे पूर्ण कराल, जेणेकरून तुम्हाला इतर कामांसाठीही वेळ मिळेल. नवीन वाहन खरेदी करू शकता.


**धनु :** आज जमीन, इमारत, वाहन यांच्याशी संबंधित कामात कमी अडथळे येतील. तुम्ही तुमच्या शौयार्ने काहीतरी नवीन कराल. पण सुरुवातीला तुम्हाला खूप संघर्ष करावा लागेल. हळूहळू परिस्थिती सुधारेल.

**मकर :** व्यवसायात परिश्रमपूर्वक काम करा. तुम्हाला यश मिळेल. परीक्षेच्या स्पर्धेतही यश मिळेल. नोकरीत वरिष्ठ अधिकाजयांशी तुमची जवळीक वाढेल. राजकारणात नवीन प्रयोग होतील.

**कुंभ :** व्यवसायाची योजना यशस्वी होण्याची शक्यता आहे. बेरोजगारांना रोजगार मिळेल. परदेशी व्यवसायात गुंतलेल्या लोकांना विशेष फायदे किंवा सन्मान मिळेल. जवळच्या मित्रांसोबत सहकार्य वाढेल.

**मीन :** आज कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होईल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये कार्यरत लोकांना महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. सौंदर्यप्रसाधने आणि हॉटेल व्यवसायात गुंतलेल्या लोकांना मोठे यश मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २२०५



**आडवे शब्द :-**

१) प्रचीती
५) एखाद्यास फडाफडा बोलणे (वा प्र.)
९) युद्धासाठी उताविळ झालेला
१२) वेगळा
१३) गौप्यस्फोट गुप्तगोष्ठ फोडणे
१४) वरवधूची मिरवणूक
१५) घट्ट मारलेला विळखा
१७) कोवळी फांदी
१९) देवदासी
२०) गीत
२२) गोष्ट
२४) गोणपाट
२५) चपलता, नवा जोम
२८) स्क्रू ड्राइवर
३२) तादाम्य, एकरूप
३५) दोन वेळा
३६) प्रजेची खुषी
३९) गणित आणि अणुचे संशोधन करणारा ऋषी
४०) गवंडी
४१) विशेष
४२) मृत्तिका
४३) अजगर
४४) गंध
४६) रात्र
४७) स्तुती करणारा
४८) वडिलांचा भाऊ
५०) दासांचा सेवक
५३) पदर
५४) साखर, गुळाचा रस
५५) दात
५६) उन्नती, उत्कर्ष, चलती
५९) सापाने टाकलेली त्वचा
६१) काळे ज्वालाग्रही खनिज
६३) प्रजा
६५) संकोच, बंधन
६६) कैफी पदार्थ
६७) उसळणे, अन्न, पाणी घशाशी येणे
६८) जंगली
६९) धोबी
७१) मध्यम प्रमाण
७३) काम, नशीब
७४) सापाची एक जात
७५) वार्ताहर
७६) अभिप्राय

**उभे शब्द :-**

१) भाषांतर करणारा
२) मालाने भरून आणलेल्या गाड्यांची खेप
३) माराची उमटलेली खूण
४) पती
६) अस्थिर,
७) बातमी
८) जेवू घालणारा
१०) बावळट मुलगी
११) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
१६) बरोबरची खूण
१८) सोने
२१) चौकशी, विचारपूस
२३) थापा मारणारा
२६) उसाचे गुऱ्हाळ
२७) अस्वल
२९) खंदक
३०) नशा आणणारा एक पदार्थ
३१) मयूर
३३) दहावी रास
३४) फ्लॅट, शहरातील छोटे घर
३५) दोन वेळा
३७) बारा वर्षाचा काळ
३८) जावई
४१) संसद सदस्य
४३) कहाणीतील गाव
४५) नम्रपणाची वृत्ती, मनधरणी
४६) गाढव
४८) कावळ्यांचे ओरडणे
४९) भरीवच्या विरुद्ध
५१) पाठविणे, हजर करणे
५२) आकाश
५४) वाघूळ, एक लहानसा प्राणी
५७) दागदागिने
५८) कष्ट करणे
६०) चलाख, हुशार
६२) सामान्य
६४) थेट, सरळ
६५) आश्रय, थारा
६८) उणेपणा, चिलखत
७०) सोन्याचा धागा
७१) पावसाची झड
७२) सारखा

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | मा | ल | खा | नी | हा | र | | भो | क्त | ड | प | स | र | णे |
| मा | ल | क | | ज | | हा | ट | क | | म | ण | | स्ता | |
| ल | | वा | रा | | पत्र | ट | क | | प | ड | जी | भ | | गो |
| कि | ल्ली | | व | र्ण | | पा | ट | व | | म | | ला | व | णी |
| मा | | क | ण | | क | ळ | क | | वा | | सा | व | र | |
| न | व | ल | | पा | ळ | णा | | त | र | | व | ण | व | ण |
| | ल्क | | पां | ड | व | | स | म | स | मा | न | | र | |
| सा | ल | स | | वा | ळ | वं | ट | | दा | स | | म | | कं |
| लो | | म | ग | | णे | | वा | न | र | | स | हा | व्य | क |
| सा | ग | र | त | ट | | र | ई | स | | सु | | रा | | ण |
| ल | व | | ध | | दा | म | | न | ज | रा | न | ज | र | |
| | त | ल | वा | र | | ता | री | ख | | पा | त | | क्षा | र |
| सु | | हा | | म | दि | रा | | व | द | न | | स | | व |
| वा | स | न | वे | ल | | म | | डा | ग | | सा | व | क्र | र |
| स | ह | सा | | | हो | | क्र | | ड | रा | व | ड | रा | व |

## ➤ महत्त्वाचे




**दायित्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने घरातील कपडे, टाकाऊतून टिकाऊ वस्तूंचा वापर करीत अंबिकानगर येथे श्रीगणेशाची स्थापना केली आहे. (छाया : सोज्वळ साळी)**

### दायित्व संस्थेचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव

**नाशिक ।** येथील दायित्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने घरातील कपडे, टाकाऊतून टिकाऊ वस्तूंचा वापर करीत अंबिकानगर येथे श्रीगणेशाची स्थापना केली आहे. संस्थेच्या अध्यक्ष किरण भावसार, खजिनदार सीमा परदेशी, सोनाली भालेराव, पूजा महाले, क्षितिजा भावसार, ऋतुजा भावसार, सोनल सदरे, तेजल पवार आदींसह महिलांनी षोडशोपचारे पूजन करून श्रीगणेशाची स्थापना केली. पंचगव्य वापरून तयार केलेल्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. गणेशोत्सव काळात संस्थेतर्फे पर्यावरण संदर्भात समाजप्रबोधन केले जात असल्याची माहिती पदाधिकारी यांनी दिली.

### माणिकराव कोकाटेंच्या नागरी सत्कार समारंभाचे उद्या आयोजन



**नाशिक ।** जिल्ह्याचे सुपूत्र माणिकराव कोकाटे यांना महाराष्ट्र राज्याचे क्रीडा मंत्री म्हणून जबाबदारी मिळाली आहे. या निमित्ताने रविवारी (ता. ३१) नाशिकच्या विविध खेळांच्या संघटना, क्रीडा संस्था आणि खेळाडू यांच्या वतीने त्यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्याचे ठरले आहे. हा सत्कार समारंभ गोखले शिक्षण संस्थेच्या बीवायके कॉलेज परिसरातील गुरुदक्षिणा हॉलमध्ये दुपारी चारला होणार आहे. क्रीडा मंत्री म्हणून नामदार माणिकराव कोकाटे यांच्याकडून भरीव कामगिरी व्हावी, त्यांना योग्य ते पाठबळ मिळावे यासाठी नाशिकचे सर्व राज्य, राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा संघटक, प्रशिक्षक, क्रीडा संघटना, क्रीडा संस्था, अर्जुन पुरस्कार आणि शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त सर्व खेळाडू, संघटक, प्रशिक्षक हे सर्व त्यांच्या बरोबर आहेत याची खात्री म्हणून या सत्कार समारंभाचे प्रयोजन आहे. यासाठी नाशिकमधील विविध खेळांचे सर्व खेळाडू, क्रीडा संघटक, प्रशिक्षक, क्रीडा संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# भगवान श्री चक्रधर स्वामी अवतारदिन महोत्सव उत्साहात

## महानुभाव पंथाच्या तीर्थस्थान, मंदिरांच्या जीर्णोद्धाराची कामे पूर्ण करणार : महंत कापूसतळणीकर बाबा

**नाशिक ।** महानुभव पंथाच्या तीर्थस्थान जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेतल्यानंतर अनेक अडचणीचा सामना करावा लागला. मात्र भगवान श्री चक्रस्वामी यांच्या कृपेने तसेच दानशूर भक्तांचे सहकार्य आणि पंथातील संत महंतांच्या मार्गदर्शनामुळे महानुभाव पंथातील सुमारे २५० पेक्षा अधिक तीर्थस्थानांच्या जीर्णोद्धाराचे कार्य पूर्ण होऊ शकले. यापुढे देखील नाशिक जिल्ह्यासह राज्यभरातील तीर्थस्थानांच्या जीर्णोद्धारासाठी कार्य सुरूच राहील ` असे विचार महंत कापूसतळणीकर बाबा यांनी व्यक्त केले.

अ. भा. महानुभाव परिषदेच्या सहकार्याने व नाशिक जिल्हा महानुभाव समितीच्या वतीने आयोजित भगवान श्री चक्रधर स्वामी जयंती महोत्सव कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. परिषदेच्या अंतर्गत नाशिक जिल्हा महानुभाव समिती यांच्यावतीने महानुभाव पंथाचे संस्थापक व मराठी भाषेचे आद्य प्रणेते भगवान श्री चक्रस्वामी अवतार दिन तथा जयंती महोत्सव व सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. नाशिक जिल्हा महानुभाव समितीच्या वतीने गेल्या ५६ वर्षापासून अखंडपणे भगवान श्री चक्रस्वामी अवतार दिन तथा जयंती उत्सव साजरा केला जातो. जयंती उत्सवाचे यंदाचे ५७ वर्ष आहे. स्वामींचा अवतार दिन तथा जयंतीचा मुख्य कार्यक्रम धर्मसभा व सत्कार सोहला. गुरुवारी (दि. २८) पंचवटी परिसरातील कोणार्कनगर येथील श्री पंचकृष्ण लॉन्स येथे संपन्न झाला. यानिमित्त पहाटे ६ वाजता देवास मंगल स्नान, श्रीमद्भगवद्गीता पाठपाराय, सकाळी ९ वाजता ध्वजारोहण, त्यानंतर सभामंडप उद्घाटन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यानंतर आयोजित धर्मसभेत प्रसंगी अ. भा. महानुभाव परिषदेचे महामंत्री महंत कापूसतळणीकर बाबा (फलटण), महंत मुधोव्यास बाबा शास्त्री ( वरोरा, चंद्रपूर ) , भागवताचार्य महंत चिरडे बाबा (निफाड), महंत तळेगावकर बाबा शास्त्री (साळवाडी, पुणे) मंहत कृष्णराज बाबा पंजाबी (शिक्रापूर, पुणे), महंत परमपूज्य आत्याबाईची (छत्रपती संभाजी नगर ) यांची व्याख्याने झाली. या प्रसंगी संत महांतांनी पंथाचे तत्त्वज्ञान भगवान श्री चक्रधर स्वामी यांचे कार्य आणि सध्याच्या काळात पंथाचे तत्त्वज्ञान समाजासाठी किती उपयुक्त आहे , याची व्याख्यानात मांडणी केली.



### विविध कार्यक्रमांसह भव्य मिरवणूक

यानिमित्त अवतार दिन महोत्सव आयोजक समितीच्या वतीने श्री दत्त मंदिर मोजे सुकेणे येथे सोमवारी (दि. २५) ६ वाजता देवास मंगलस्नान, ऊटी, विडा अवसर, गितापाठ झाले. ९ वाजता ध्वजारोहण झाले असून जयंती सोहळ्यानिमित्त अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे उपाध्यक्ष महंत सुकेणकर बाबा यांच्या हस्ते श्री सुखदानी बाबास विडा अवसर, पूजन, आरती, उपहार संपन्न झाले. मंगळवारी (दि. २६) सकाळी ९ ते ११ वा. श्री चौरंगी विद्या स्थान, कोणार्कनगर येथे प. पू. अंकुळनेरकर बाबा " लीळा वैभव यावर पारायण झाले. बुधवारी (दि. २७) दुपारी ४ वाजता आडगाव येथील श्री चक्रस्वामी मंदिर ते श्रीपंचकृष्ण लॉन्स, कोणार्कनगर पर्यंत श्री मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी श्रीचक्रधर गोप मंडळ, खेरवाडी तसेच संत महंत व सदभक्त यामध्ये सहभागी झाले होते. त्यानंतर रात्री आठ वाजता प .पू. मंहत प्रभाकर बाबा कपाटे (भोकर नांदेड) यांचे जाहीर कीर्तन झाले . यावेळी साथ संगत जिव्हाळे, आडगाव व ब्राह्मणवाडे येथील भजनी मंडळ यांनीकेली होती.

याप्रसंगी माजी आमदार बाळासाहेब सानप यांनी मनोगत व्यक्त केले. राज्य शासनाच्या वतीने महानुभव पंथाच्या विविध कार्यासाठी कोट्यावधीचा निधी देण्यात आला असून, रिद्धपूर येथे मराठी भाषेचे पहिले विद्यापीठ स्थापन झाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महंत सुकणेकर बाबा यांनी अध्यक्षीय समारोप केला. या प्रसंगी व्यासपीठावर प्रकाश नन्नावरे, दत्ताजी गायकवाड, लक्ष्मण जायभावे, भास्करराव सोनवणे, डॉ. किरण देशमुख, पांडुरंग बोधले, राजेंद्र जायभावे, पुंजाभाऊ सांगळे, उदय सांगळे , प्रभाकर भोजने, किरण मते, विजय राऊत, अरुण महानुभव, नंदू हांडे आदींसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बाळकृष्ण अंजनगावकर यांनी केले. आभार प्रदर्शन महंत गोपीराज शास्त्री सुकणेकर यांनी केले. या प्रसंगी स्थान जीर्णोद्धार यासह विविध ग्रंथांचे संत महंत आणि मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. माजी आमदार बाळासाहेब यांच्या हस्ते आहे संत, महंतांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. त्यानंतर १२ व वाजता विडा अवसर, महापूजा, आरती व उपहार आदी कार्यक्रम संपन्न झाले. कार्यक्रमास अर्जुनराज आप्पा सुकेणेकर (कार्याध्यक्ष), बाळकृष्ण नाना सुकेणेकर (सहकार्याध्यक्ष), गोपीराज शास्त्री सुकेणेकर, गोविंदराज बाबा अंकुळनेरकर, राजधरदादा सुकेणेकर, अनिल जाधव, दौलतराव मोरे, बाळासाहेब टर्ले, गोपीनाथ अमृते, पंडितराव पागेरे, प्रभाकर कातकाडे, राजेंद्र निकम, लालजी पागेरे तसेच जिल्हा निवासी सर्व संत महंतमोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेनरोड येथील मनपाच्या गणेशोत्सव मंडळाला आयुक्तांची जिल्हाधिकाऱ्यांसह भेट



**नाशिक ।** गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी जलज शर्मा आणि नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनिषा खत्री यांनी मेन रोड येथील नाशिक महानगरपालिका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या देखाव्याला भेट दिली.

विठ्ठलाचे दर्शन घेत पंढरपूर येथील नामदेव पायरी असा पर्यावरण पूरक देखावा नाशिक महानगरपालिका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी साकार केला त्याचे कौतुक यावेळी त्यांनी कौतुक केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त तथा कुंभमेळा आयुक्त करिष्मा नायर, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, मुख्या लेखाधिकारी दत्तात्रय पाथरूट, शहर अभियंता संजय अग्रवाल, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, नितीन पाटील, रवींद्र बागुल, निलेश साळी, विभागीय अधिकारी राजाराम जाधव, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आदींनी नामदेव पायरीचे दर्शन घेतले.

## गोदावरी आरती नाशिकचा अभिमान

**नाशिक ।** महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा प्राण म्हणजे गणेशोत्सव. दहा दिवस चालणारा हा उत्सव भक्तिभाव, आनंद, समाजसेवा आणि एकात्मतेचा महामहोत्सव म्हणून साजरा होतो. महाराष्ट्रातील प्रत्येक गल्लीबोळ, प्रत्येक गाव या दिवसांत गणेशमय होतो. परंतु या उत्सवाच्या सजावटी, भजन, कीर्तन, सामाजिक उपक्रमांच्या सोबतच एक वैशिष्ट्यपूर्ण आयाम म्हणजे 'गोदावरी महाआरती'. रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या पुढाकारामुळे गेल्या काही वर्षांत गणेशोत्सवातील या महाआरतीने महाराष्ट्राच्या भक्तिभावाला नवी दिशा दिली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही समितीला महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून महाआरती सादर करण्यासाठी आमंत्रणे प्राप्त झाली आहेत. नाशिक जिल्ह्यातील झोडगे, मालेगाव, सटाणा, संभाजीनगर, ईश्वरपूर, तसेच कोल्हापूर, सांगली, पुणे या शहरांसह महाराष्ट्राच्या पलिकडे गुजरातमधील सुरत व ब्यारा, कर्नाटकातील मुधोळ, आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम आणि अगदी काश्मीरपर्यंत ही आमंत्रणे पोहोचली आहेत. समितीकडे याची लेखी नोंद असून, हे नाशिककरांसाठी अभिमानास्पद ठरले आहे. गोदामातेचे पावित्र्य आणि नासिकच्या धार्मिक वारशाची पताका देशभर फडकत असल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे.

**मुंबई… कोल्हापूरमध्ये भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग**

गत दोन दिवसांत मुंबई आणि कोल्हापूर येथे झालेल्या महाआरतींना असंख्य भक्तांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. आरतीच्या वेळी हजारोंच्या संख्येने भाविकांनी गोदामातेच्या गजरात सहभाग घेतला. विशेष म्हणजे मुंबईतील काळाचौकी मित्र मंडळातर्फे आयोजित महाआरतीचे थेट प्रक्षेपण केवळ एका तासात दीड लाखांहून अधिक भक्तांनी ऑनलाईन पाहिले. हा एक विक्रम मानला जात असून, गोदावरीवरील भक्तीभाव आणि नासिकच्या संस्कृतीबद्दल असलेल्या जनमानसातील प्रेमाचे हे जिवंत प्रतीक ठरले आहे.

**नाशिकचा अभिमान…. गोदामातेचा झगमगता दीप**

समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या यशाचे श्रेय नासिककरांच्या श्रद्धा, प्रेम व पाठिंब्याला दिले. "ही महाआरती केवळ धार्मिक सोहळा नाही; ती गोदामातेच्या पावित्र्याची, नाशिकच्या अध्यात्मपर संस्कृतीची आणि राष्ट्रीय एकात्मतेची झगमगती पताका आहे," अशा भावना समितीने व्यक्त केल्या. युवा गोदासेवकांनी दाखविलेला उत्साह, निःस्वार्थी श्रम आणि समर्पण पाहून समितीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

**भाविकांसाठी प्रेरणास्थान**


"हा उपक्रम केवळ समितीचा नव्हे, तर समस्त नाशिककरांचा अभिमानाचा ठेवा आहे. नासिककरांच्या अलोट प्रेम व सहकार्यामुळेच हे उपक्रम यशस्वी होतात," असे समितीच्या वतीने सांगण्यात आले. आगामी काळात या महाआरतीचा प्रेरणादायी प्रकाश संपूर्ण देशभर पसरून गोदामातेच्या नामस्मरणाचा जाज्वल्य दीप प्रज्वलित ठेवेल, यात शंका नाही.

# 'भुजबळ' झाले नाशिककरांच्या मनातील 'पालकमंत्री'!

**मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकच्या कुंभमेळ्याच्या संदर्भात आढावा बैठक घेतली, याचे नाशिकच्या जनतेने मनापासून स्वागत केले. जळगाव जिल्ह्यातील जामनेरचे नेतृत्व करणाऱ्या माणसाच्या हातात नाशिकची सूत्रे हाती देऊन दस्तुरखुद्द भाजपचेच कार्यकर्ते व नेते खुश नाहीत, असे बोलले जात आहे. ठराविक कोंडाळ्यांच्या मदतीने नाशिकवर कब्जा करण्याचे कुंभमंत्री (?) गिरीष महाजन यांचे स्वप्न आहे. वास्तविक पाहता नाशिकमध्ये चार चार मंत्री आहे. प्रत्येकाची एक स्वतंत्र काम करण्याची शैली आहे. एकात आक्रमकता आहे, दुस-याची मृदू भाषा आहे, तिस-याची काम करण्याची तडफ आहे, तर एकाकडे मंत्रीपदाचा दीर्घ अनुभव आहे. त्यापैकी एकालाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री करत नाही याचे गौडबंगाल काय असावे? ज्या महाजनांना अजून नाशिक काय आहे, हे अजून पूर्ण माहीत नाही, त्यांनाच नाशिककरांच्या बोडक्यावर का बसविले जाते? बरं झालं भुजबळांनी कुंभमेळ्याच्या संदर्भात आढावा बैठक घेतली. त्यांना रोखण्याची हिंमत आहे तरी कोणाकडे ? मुळातच या क्षणाला जिल्ह्यातील चार मंत्र्यांपैकी तिघांनी वाद नको म्हणून शांत बसण्याची भूमिका घेतली. या तिघांचाही भुजबळांना नव्हे तर चौघांपैकी कुणालाही पालकमंत्री केले तरी एकमेकांचा विरोध असणार नाही. पण शांत बसतील ते भुजबळ कसले ? त्यांनी आपला बंडखोर बाणा प्रखरपणे जिल्ह्यालाच नव्हे तर महाराष्ट्राला दाखवून दिला. या क्षणाला तरी नाशिककरांनी त्यांना जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून समजायला सुरुवात केली आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने होणारी विकास कामे वेळेत पूर्ण करावीत हीच सगळ्यांची इच्छा आहे. कुंभमेळ्यानिमित्त नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे कोट्यवधी रुपयांच्या निधीतून विविध विकास कामे होणार आहेत. ही सर्व कामे गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करतानाच ती वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी, यासाठी त्यांनी पुढाकार घेतल्याने त्यांचे अभिनंदनच केले पाहीजे. खरं म्हणजे कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री, कुंभमेळा आयुक्त तथा प्राधिकरणाच्या सदस्य सचिव करिश्मा नायर यांचा संपर्क येथे दररोज होऊ शकतो. मुख्यमंत्र्यांनी देखील पालकमंत्री पदाचा प्रश्न प्रतिष्ठेचा न करता त्या पदाची सूत्रे भुजबळांकडे दिली तर नाशिककरांना दिलासा मिळेल असे वाटते..!**

**ना**शिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्त अध्यात्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाला नियोजन करावे लागणार आहे. याबरोबरच पर्यटन, आरोग्य, शैक्षणिक सुविधांच्या निर्मितीबरोबर कृषीवर आधारित प्रक्रिया उद्योगांना चालना द्यायला भुजबळच आघाडीवर असतील. भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, म्हणून भुजबळ नित्यनियमाने नाशिकमध्ये बैठका घेऊ शकतात. त्यासाठी बाहेरचा पालकमंत्री जळगावहून आयात करण्याची गरज नाही. सिंहस्थाच्या नियोजनाबाबत राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर अनेक बैठका झाल्या. मेळा मंत्रीपद भाजपच्या गिरीश महाजनांकडे असल्याने शिंदे सेनेचे किंवा राष्ट्रवादीचे मंत्री अथवा आमदार या बैठकांकडे फीरकतही नव्हते. परंतु आता पालक मंत्रिपदाचा नाशिकचा तिढा सुटलेला नसताना अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी सिंहस्थाच्या कामांची सद्यस्थिती तसेच भविष्यातील नियोजन जाणून घेण्यासाठी बैठक घेतली व सूचना करायला सुरूवात केली. आता सर्वात प्रथम नाशिक - त्र्यंबकेश्वर रस्त्याचे काम प्रथम प्राधान्याने पूर्ण करावे लागणार आहे. समृध्दी महामार्गाला इगतपुरीहून असलेल्या इंटरचेंज रस्त्याचे काम पूर्ण करण्याची गरज आहे. वाहतूक सुरळीत होण्यासाठी यापूर्वी केलेल्या रिंगरोडसह अन्य रस्त्यांचे बळकटीकरण कधी होणार ? कुंभमेळ्यासाठी बाहेरुन येणाऱ्या भाविकांना जिल्ह्यातील अन्य अध्यात्मिक आणि पर्यटन स्थळांना भेटी देता येईल यादृष्टीने नियोजन करण्याकडे भुजबळच लक्ष देऊ शकतात. यामुळे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळून रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल. गोदावरी नदी स्वच्छ आणि प्रदूषण रहित राहील याची दक्षता स्थानिक नेता म्हणून ते प्रभावी भूमिका घेवू शकतील. त्यासाठी तातडीने उपाययोजना कशा कराव्यात, याचा त्यांना दिर्घ अनुभव आहे. कुंभमेळ्यानिमित्त भाविकांची संख्या लक्षात घेऊन नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे नवीन घाटांचा विकास करतानाच यापूर्वी बांधलेल्या घाटांची दुरुस्ती करावी लागणार आहे. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वय कसा साधावा याबाबत भुजबळ आग्रही राहतील. कुंभमेळा सुरक्षित, स्वच्छ, पर्यावरण पूरक होण्यासाठी नियोजन करावे लागणार आहे. त्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन झाले आहेच. दीर्घ कालावधी लागणारी कामे तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्या तरी स्थानिक पालकमंत्र्याचा दबदबा महत्वाचा ठरू शकेल.



### ज्या हातात बेड्या त्याच हातात पुष्पगुच्छ!

छगन भुजबळांना मानावेच लागेल. लोकं त्यांना उगाच `आर्म स्ट्राँग` म्हणतं नाहीत. कुणाचे दात त्यांच्याच घशात कसे घालायचे तेही एका बुक्कीत हे भुजबळांना चांगले जमते. त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत ज्या व्यक्तीने सगळ्यात जास्त तेही बेंबीच्या देठापासुन केकटून, ओरडून, तमाशा करून भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांना तुरुंगात सडवण्याची नुसती भाषाच केली नाही तर तुरुंगातसुद्धा पाठवले. एव्हढं सगळ होऊनही त्यांचे मनोबल काही तुटले नाही. आज अशी परिस्थिती निर्माण केलीत की त्याच व्यक्तीच्या हातून त्यांनी त्यांच्याच मंत्रिमंडळात मंत्रिपद स्विकारले व तेही त्यांच्याच नेतृत्वात. ज्या हातात बेड्या घालणार होते, त्या हातात पुष्पगुच्छ द्यावा लागला, गळ्यात मंत्रिपदाची माळ घालावी लागली. संपूर्ण जिल्हाच नव्हे तर अख्खा महाराष्ट्र त्याचा साक्षीदार आहे. भुजबळांचे अनेकांशी जिल्ह्यातही मतभेद झाले. परंतु ते त्यांनी कायमस्वरूपी ठेवले नाही. परिस्थितीनुसार एकमेकाला सांभाळून घेण्याची भूमिका त्यांनी वारंवार घेतली. जिल्ह्याचा त्यांचा अभ्यासही चांगला आहे. ओबीसी नेता म्हणून त्यांचा वापर करताना मुख्यमंत्र्यांना भुजबळ चालतात. मग पालकमंत्री म्हणून स्वतःचेच प्यादे पुढे का ढकलले जाते ? त्यामुळे जिल्ह्यातील नेते व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव त्यांनी आक्रमक भूमिका घेऊन आढावा बैठक घेतली व आपण पालकमंत्री पदाच्या स्पर्धेतून मागे नाही, हे दाखवून दिल्यामुळे नाशिककरांनी त्यांना पाठिंबा दिलाच पाहिजे.

### बरं झालं भुजबळांनी आक्रमक भूमिका घेतली

रायगड जिल्ह्यासोबतच नाशिकच्या पालकमंत्री पदावरून महायुतीमधील धुसफूस सुरू असतांनाच अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी एकदाचा नाशिकच्या पालकमंत्री पदावर दावा ठोकला. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वाधिक सात आमदार असल्याने पालक मंत्रिपद आपल्याकडेच असावे, असा आग्रह धरला त्यांनी धरला यात वावगे काहीच नाही. त्यातच शिंदे गटाचे एक वादग्रस्त मंत्री संजय शिरसाट यांनी नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकत्र निर्णय घेतील. वरिष्ठांचा जो निर्णय असेल तो सर्वांना मान्य असेल आणि यावर वाद घालण्यात काही अर्थ नाही, असे जणूकाही अतिशय ज्येष्ठ मंत्री असल्यासारखे वक्तव्य केले. वास्तविक पाहतात त्यांची स्वतःचीच कारकीर्द काळीकुट्ट झालेली असताना त्यांनी नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबत नाक का खुपसले हे कळायला मार्ग नाही. सिंहस्थ नियोजनासाठी स्थानिक पालकमंत्री नाही. रायगडला अवघा एकच आमदार असताना पालक मंत्रिपद मिळाले. पण नाशिकमध्ये राष्ट्रवादीचे सात आमदार अन् त्यातील तीन मंत्री स्थानिक असतानाही पालकमंत्री अद्याप जाहीर न झाल्याने, बरं झालं भुजबळांनी आक्रमक भूमिका घेऊन आढावा बैठक घेतली. अर्थात नांदगावचे आमदार सुहास कांदे यांनी `भुजबळ नको` अशी भूमिका घेतली असली तरी `भुजबळ नको मग कोण हवे` याचे उत्तर मात्र त्यांनी दिलेले नाही.



# बालांगण

## मोहिमा संरक्षण दलांच्या



मित्रमैत्रिणींनो, आपल्या देशावर संकट आलं की संरक्षण दलं सज्ज होतात. शत्रूचं आव्हान परतवून लावतात. आपलं लष्कर, नौदल आणि हवाई दल विविध मोहिमा राबवतं. या मोहिमांमध्ये आपले धाडसी सैनिक सर्वस्व पणाला लावतात. भारतीय संरक्षण दलांनी आजवर राबवलेल्या अशाच काही मोहिमांविषयी...

▸▸ भारताने कारगिल युद्धात विजय मिळवला. भारताची ही मोहीम ऑपरेशन विजय म्हणून ओळखली जाते. भारतीय क्षेत्रात घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैन्याला परतवून लावण्यासाठी ही मोहीम आखण्यात आली होती. २६ जुलै १९९९ हा दिवस कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो.

▸▸ जुलै २०१६ मध्ये दक्षिण सुदानमधल्या अंतर्गत युद्धात ६०० भारतीय अडकून पडले होते. त्यांना यशस्वीपणे सोडवून आणण्यासाठी संकटमोचक ही मोहीम राबवण्यात आली आणि ती यशस्वीही ठरली.

▸▸ उत्तराखंड तसंच हिमाचल प्रदेशमध्ये २०१३ च्या जून महिन्यात पावसाने धुमाकूळ घातला. या पावसात हजारो लोक अडकले होते. या लोकांना वाचवण्यासाठी भारताच्या हवाई दलाने 'ऑपरेशन राहत' ही मोहीम राबवली होती.

**जाणून घ्या**

▸▸ 'हुडहूड' नावाच्या चक्रीवादळाने २०१४ मध्ये आंध्र प्रदेश, विशाखापट्टणम आणि ओरिसाच्या किनारपट्टीच्या भागात धुमाकूळ घातला होता. या वादळातून लोकांना सोडवण्यासाठी 'ऑपरेशन लहर' ही मोहीम राबवण्यात आली होती.

## असा आहे हँडबॉल

**फन टाईम**

दोस्तांनो, फुटबॉल, व्हॉलिबॉल हे खेळ तुम्हाला माहीत असतील. यासोबतच हँडबॉल नावाचा एक क्रीडाप्रकार आहे. जपानमध्ये नुकतीच महिलांची जागतिक हँडबॉल अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या निमित्ताने हँडबॉलविषयी जाणून घेऊ..

▶ हँडबॉल हा सांघिक खेळ आहे. हँडबॉलच्या एका संघात सात खेळाडू असतात. फुटबॉलमध्ये पायांनी बॉल मारायचा असतो. विरुद्ध संघाच्या गोलजाळ्यात बॉल गेल्यावर गोल होतो. हँडबॉलचंही तसंच आहे. यातही बॉल विरुद्ध संघाच्या गोलजाळ्यात टाकावा लागतो.

▶ हँडबॉलचचा एक सामना तासभराचा असतो. यात अर्ध्या तासाचे दोन हाफ असतात. हँडबॉल हा खूप वेगवान खेळ आहे. यात खेळाडू एकमेकांच्या अंगाला स्पर्श करू शकतात.

▶ हँडबॉल हा इनडोअर गेम आहे. पण हँडबॉलचे काही प्रकार मैदानात खेळले जातात. 'फील्ड हँडबॉल', 'चेक 'हँडबॉल', 'बीच हँडबॉल' हे आउटडोअर हँडबॉलचे काही प्रकार आहेत.

▶ या खेळात पाय सोडून शरीराच्या कोणत्याही भागाने बॉलला स्पर्श करता येतो. फुटबॉलमध्ये बॉल डोक्याने मारता येतो. पण हँडबॉलमध्ये ही परवानगी नसते. गोलकीपर पायांनी बॉल अडवू शकतो. तसंच त्याला बॉल अडवण्यासाठी शरीराच्या कोणत्याही भागाचा वापर करता येतो.



## कांदा चिरताना...

**वाचा तर खरं**

मित्रांनो, कांदा चिरायला सुरुवात करताच आपल्या डोळ्यांतून पाणी येते. तुम्हीही हे अनुभवले असेल. कांदा चिरताना आई-बाबांचे डबडबलेले डोळेही पाहिले असतील. पण असे का होते, याचा कधी विचार केला आहे? चला, आज यामागील कारण पाहू या.

मुलांनो, कांद्याच्या थरांमध्ये खूप बारीक पेशी असून त्यामध्ये सल्फर संयुगे आणि एंजाइम असतात. सहसा हे दोन्ही वेगळे राहतात. परंतु सुरीने कांद्याच्या पेशी विलग होऊ लागतात ते घटक एकत्र येतात आणि या रासायनिक अभिक्रियेमुळे एक तीव्र वायू निर्माण होतो. त्याला लॅक्रिमॅटरी फॅक्टर म्हणतात. या वायूमुळे डोळ्यांची आग होते. पाणी येते.

आपले डोळे खूप संवेदनशील असतात आणि कोणत्याही प्रकारच्या हानिकारक रसायनापासून किंवा वायूपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी ते लगेच प्रतिक्रिया देतात. म्हणूनच कांद्यातून उत्सर्जित होणारा वायू डोळ्यांच्या संपर्कात येतो तेव्हा डोळे त्याला धोकादायक पदार्थ मानतात आणि हा धोका टाळण्यासाठी डोळ्यांच्या अश्रू ग्रंथी लगेच अश्रू सोडू लागतात. अश्रूंचे काम हा वायू धुवून टाकण्याचे असते जेणेकरून डोळे सुरक्षित राहू शकतील.

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की ही कांद्यामधील एक नैसर्गिक संरक्षण यंत्रणा आहे. निसर्गानेच कांद्याला असे रसायन बनवण्याची क्षमता दिली आहे, जेणेकरून कोणताही कीटक किंवा प्राणी हानी पोहोचवू शकणार नाही. स्वाभाविकच अनेक प्राणी कांद्यापासून लांब राहतात. मात्र तुम्हाला कधी कांदा चिरण्याची वेळ आली आणि डोळ्यांची जळजळ टाळायची असेल तर एक काम करा. चिरण्यापूर्वी कांदा १०-१५ मिनिटे फ्रिजमध्ये ठेवा. थंड कांदे कमी गॅस सोडतात. दुसरे म्हणजे धारदार चाकू वापरा. यामुळे कांद्याच्या पेशी कमी तुटतील आणि कमी गॅस निर्माण होतो. कांदे कापताना जवळच पाण्याने भरलेले भांडे ठेवा किंवा कापण्यापूर्वी कांदा पाण्यात बुडवा. यामुळेही गॅस पाण्यात विरघळेल आणि डोळे जळजळणार नाहीत.



**ठिपके जुळवा**



## जमाना स्टार्ट अप्सचा

दोस्तांनो, तुम्ही स्टार्ट अप या संकल्पनेबद्दल ऐकलं असेल. अनेकजण स्वत:ची स्टार्ट अप सुरू करतात. स्टार्ट अप म्हणजे स्वत:ची कंपनी. कोणत्याही शाखेतली पदवी मिळवल्यानंतर स्टार्ट अप सुरू करता येईल. ही स्टार्ट अप्स वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये काम करतात. कमी भांडवल असलं तरी स्टार्ट अप्स सुरू करता येतात. कमी भांडवलात कोणती स्टार्ट अप्स सुरू करता येतील याविषयी माहिती असायला हवी. भविष्यात तुम्हीही या स्टार्टअप्सचा विचार करू शकता.

**कोण होणार?**

❶ छायाचित्रणाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. इव्हेंट फोटोग्राफर म्हणून तुम्ही नाव कमवू शकता. फोटोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर दर्जेदार कॅमेरा घेऊन करीअरला सुरूवात करता येईल. यासाठी फारशा भांडवलाची गरज नसते. पुरेसा अनुभव मिळाला की स्वत:ची फोटोग्राफी प्रशिक्षण संस्थाही सुरू करता येते.

❷ भारतात चारचाकी वाहनांची बाजारपेठ विस्तारते आहे. तुम्हीही गाड्यांच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करू शकता. सेकंड हँड गाड्यांचीही विक्री करता येईल.

❸ देशभरात वाहनांच्या संख्येत प्रचंड वाढ होत आहे. त्यामुळे वाहन चालवण्याचे धडे देण्यासाठी प्रशिक्षकांची गरज असते. ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून वाहन चालवण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. हा व्यवसायही चांगला नफा मिळवून देतो.

❹ ब्युटी पार्लर किंवा स्पा क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून स्वत:चं पार्लर किंवा स्पा सुरू करता येईल. या व्यवसायातही अनेक संधी आहेत.



## असं का?

### डास चावल्यानंतर का येते खाज?

मुलांनो,डास चावल्यानंतर तो भाग खाजू लागतो. अंगावर छोटासा फोडही येतो. असं का बरं होत असावं? माणसाच्या शरीरातून रक्त शोषण्यासाठी डास डंख मारतो. डासाचा डंख आपल्या शरीरात जातो. डासाने डंखआणि वारंवार मारल्यावर आपल्या शरीरातल्या रक्ताची गुठळी होते. रक्त शोषून घेताना डासाच्या शरीरात एका रसायनाची निर्मिती होते. हे रसायन माणसाच्या शरीरात गेल्यावर खाज सुटते. डास चावल्यानंतर माणसाच्या शरीराचा तो भाग संवेदनशील बनातो. सतत खाजवल्यामुळे त्या भागावर सूज येते. तसंच जंतूसंसर्गाचा धोकाही असतो. त्यामुळे डास चावल्यावर वारंवार खाजवणं टाळायला हवं.



### थंडीत का येतात मुंग्या?

मुलांनो, थंडीत हातापायांना सारख्या मुंग्या येतात. तापमान खूपच कमी झालं असेल तर हातापायांना मुंग्या येण्याचं प्रमाण वाढतं. सर्वसाधारणपणे आपले हात आणि पाय उघडे असतात. बाहेरच्या थंडीमुळे शरीराच्या उघड्या भागातलं रक्त गोठायला सुरुवात होते. गोठल्यामुळे रक्त वाहण्याची गती मंदावते. यामुळे हातापायांना मुंग्या येतात. याच कारणामुळे हातापायांची ताकदही कमी होते. थंड पाण्यात हात घातल्यानंतरही असं होतं.



## जगात कुत्र्यांची संख्या किती?

**माहिती असावे**

छोट्या दोस्तांनो, सध्या तुम्ही भटके कुत्रे, कबुतरांना दाणा-पाणी घालण्यावरुन सुरू असणारा वाद ऐकत असाल. पण मित्रांनो, ही केवळ आपल्या देशातील समस्या नाही. जगातील अनेक देशांमध्ये जास्त प्रमाणात कुत्रे आहेत. चला, जाणून घेऊ या कुत्र्यांची आकडेवारी...

कुत्र्यांची संख्या सर्वाधिक असणाऱ्या टॉप १० देशांच्या यादीत दहावा क्रमांक रोमानियाचा लागतो. इथे कुत्र्यांची संख्या सुमारे ४१ लाख आहे. १९८० च्या दशकात लोक गावांमधून शहरांमध्ये स्थलांतरित झाले, तेव्हा बरेच कुत्रे मागे राहिले आणि हळूहळू भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली. एकेकाळी, संख्या नियंत्रित करण्यासाठी त्यांना मारले जात होते. परंतु प्राणी हक्क संघटनांच्या निषेधानंतर ती थांबवावी लागली. त्यामुळे येथे भटक्या कुत्र्यांची समस्या मोठी आहे.

* फ्रान्समध्ये सुमारे ७४ लाख कुत्रे आहेत. तेथे प्रत्येक पाळीव कुत्र्याला मायक्रोचिप बसवून लसीकरण करणे आवश्यक आहे. या कारणास्तव, रेबीजचे प्रमाण खूप कमी आहे. तथापि, दरवर्षी लाखो कुत्रे सोडून दिले जातात आणि भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढते.

* या यादीत आठव्या स्थानी अर्जेंटिना असून तेथे सुमारे ९२ लाख कुत्रे आहेत. सरकार वेळोवेळी लसीकरण आणि नसबंदी मोहिमा राबवून त्यांची संख्या नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असले तरी यश आलेले दिसत नाही.

* यादीत सातव्या स्थानी फिलीपिन्स असून तेथे कुत्र्यांची संख्या १.१६ कोटी आहे. स्वाभाविकच रेबीजमुळे होणारे मृत्यू हा येथील चिंतेचा विषय होते. सरकार कुत्र्यांना मारण्याऐवजी लसीकरण आणि नसबंदीचा अवलंब करत आहे.

* जपान या यादीमध्ये सहाव्या स्थानी आहे. तेथे सुमारे १.२० कोटी कुत्रे आहेत. येथे बरेच लोक मुलांऐवजी पाळीव कुत्र्यांना कुटुंबाचा भाग मानतात. यामुळेच जपानचा पाळीव प्राणी उद्योग १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे.

* यादीमध्ये पाचव्या स्थानी असणाऱ्या रशियामध्ये सुमारे १.५० कोटी कुत्रे आहेत. येथे 'मेट्रो डॉग्स' म्हणून ओळखली जाणारी भटकी कुत्री तर ट्रेन आणि बसमध्ये प्रवास करायला शिकली आहेत. सरकार आणि सामान्य लोक एकत्रितपणे त्यांची काळजी घेतात.



* कुत्र्यांच्या संख्येबाबत भारत जगात चौथ्या क्रमांकावर असून आपल्याकडे सुमारे १.५३ कोटी भटके कुत्रे आहेत. अर्थातच हे देशापुढील मोठे आव्हान असून सरकारने पुढील वर्षभरात ७० टक्के कुत्र्यांचे लसीकरण आणि निर्जंतुकीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

* तिसऱ्या स्थानी असणाऱ्या चीनमध्ये २.७४ कोटी कुत्रे आहेत. पूर्वी तेथील काही शहरांमध्ये कुत्रे पाळण्यावर बंदी होती, परंतु आता लोकांनी कुत्रे पाळण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे चीनमधील पाळीव प्राणी बाजारपेठ देखील वेगाने वाढली आहे.

* यादीत दुसऱ्या स्थानी असणाऱ्या ब्राझीलमध्ये सुमारे ३.५७ कोटी कुत्रे आहेत. मात्र सरकारने लसीकरण आणि काळजी घेण्यासाठी चांगली व्यवस्था स्थापन केली आहे.

* जगभराचा विचार केला तर या यादीमध्ये अमेरिका अव्वल स्थानावर असून तेथे सुमारे ७.५८ कोटी कुत्रे आहेत. पाळीव प्राण्यांच्या काळजीसाठी तेथे विशेष डॉग पार्क, ग्रूमिंग सेंटर आहेतच खेरीज त्यांचे संरक्षण करणारे कडक कायदेही आहेत. प्राण्यांवरील क्रूरतेच्या प्रकरणांमध्ये इथे कठोर कारवाई केली जाते.

## अन्नाची नासाडी टाळण्यासाठी...

**समाजभान**

मुलांनो, सध्या लग्नाचा हंगाम आहे. लग्नप्रसंगी भरपूर प्रमाणात अन्न शिजवलं जातं. पार्ट्यांमध्येही विविध प्रकारचे खाद्यपदार्थ असतात. हे पदार्थ भरपूर प्रमाणात तयार केले जातात. लग्न, पार्ट्यांमधलं जेवणं उरतं. बरेचदा घरातलं जेवणही उरतं. आपण बाहेरचं खाल्ल्यावर घरी केलेले पदार्थ टाकून दिले जातात. पण अन्नाची नासाडी होता कामा नये. या जगात अनेकांना अन्न मिळत नाही आणि आपण अन्न वाया घालवतो. अन्न वाया घालवणं योग्य नाही. अन्नाची नासाडी टाळण्यासाठी काय करता येईल याविषयी...

- हॉटेलमध्ये गेल्यावर उगाचच भरपूर पदार्थ मागवून ठेवू नका. सुरूवातीला थोडंच मागवा. अजून लागलं तरच ऑर्डर द्या. भरपूर पदार्थ मागवल्यामुळे अन्न आणि पैसे दोन्हीही वाया जातात.
- घरात पार्टीचं आयोजन केल्यानंतर भरपूर अन्न उरलं तर ते टाकून देऊ नका. हे अन्न गरीबांना वाटा. बऱ्याच संस्था उरलेलं अन्न घरातून घेऊन जातात आणि गरीबांना वाटतात. अशा संस्थांचा शोध घ्या. लग्नसमारंभांमध्येही ही संकल्पना लढवता येईल.
- घरचं अन्न वाया घालवू नका. बाहेर खाणार असाल तर आईला तसं कळवा. घरी जेवण केलं असेल तर उगाचच बाहेर खाऊ नका.
- आपल्या मित्रमैत्रिणींनाही याबाबत सांगा. अशा संस्थांची माहिती द्या. अन्न वाया घालवणं किती चुकीचं आहे याची जाणीव करून द्या.






### दोस्त हे मस्त

#### जग किटकांचं

फ्युनेल वेब स्पायडर हा जगातला सर्वात विषारी कोळी आहे. ड्रॅगनफ्लाय ही माशी सहा महिने जगते. डासांची लांबी जवळपास १६ मिलीलीटर इतकी असते. डास आपल्या वजनाच्या तीन पट अधिक रक्त शोषू शकतो. या पृथ्वीवरच्या एका फुलपाखराचं नाव ८९९८ आहे. कारण याच्या एका पंखावरची नक्षी ८९ या आकड्यासारखी तर दुसऱ्या पंखावरची नक्षी ९८ या आकड्यासारखी दिसते.



### खादाडी

#### पीनट बटर रॅप



संध्याकाळच्या वेळी पोटभरीचं काहीतरी खावंसं वाटतं. अशा वेळ पीनट बटर रॅप हा पदार्थ खाता येईल. यासाठी दोन चमचे पीनट बटर, एक चमचा चोको चिप्स, एक केळं, एक चमचा मध, पोळी किंवा पराठा असं साहित्य घ्या. केळ्याचे गोलाकार काप करून घ्या. पोळीवर पीनट बटर लावा. त्यावर केळ्याचे काप ठेवा. त्यावर चोको चिप्स पसरवा. त्यावर मध घाला. पोळीचा रोल करा. मस्तपैकी खा. डब्यातली पोळी उरली तर तिला अशा प्रकारे ट्विस्ट देता येईल.

### स्टडी टिप्स

#### अभ्यास गणिताचा

मुलांनो, तुम्हाला गणित हा विषय अवघड वाटतो का? गणिताची भीती वाटते का? गणिताची भीती वाटायचं काहीच कारण नाही. ही भीती घालवण्यासाठी विविध प्रयोग करता येतील. गणिताचा भरपूर सराव करायला हवा. गणितात बरीच सूत्रं असतात. गणिताची प्राथमिक सूत्र लक्षात ठेवली की तुम्हाला हा विषय सोपा जाईल. गणित हा विषय नीट समजून घेणं गरजेचं आहे.



### योगा टाईम

#### करा हलासन

मुलांनो, अभ्यास लक्षात ठेवावा लागतो. यासाठी स्मरणशक्ती चांगली असावी लागते. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी वेगवेगळी आसनं करता येतील. यापैकी एक आसन म्हणजे हलासन. पण फक्त हे आसन करून भागणार नाही. तुम्ही पोषक आहार घेतला पाहिजे. हिरव्या भाज्या आणि फळं खाणं गरजेचं आहे. यामुळे तुमची स्मरणशक्ती सुधारेल आणि अभ्यास नीट लक्षात राहील.





# सलग तिसऱ्या दिवशी मार्केट घसरणीसह बंद

## सेंसेक्स 271 अंकांनी कोसळला

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

शुक्रवारी शेअर मार्केट सलग तिसऱ्या दिवशी घसरणीसह बंद झाला. दोन्हीही बेंचमार्क इंडेक्स लाल निशाण्यावर क्लोज झाले. सेंसेक्समध्ये २७१ अंकांची घसरण झाली, तर निफ्टी ५० मध्ये ७४ अंकांची घसरण झाली.

शुक्रवारी सेंसेक्सने ८०,०१० या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाच्या शेवटी तो ७९,८०९ या पातळीवर बंद झाला. तर निफ्टी ५० शुक्रवारी २४,४६६ या पातळीवर उघडला आणि दिवसाच्या शेवटी ०.३० टक्क्यांच्या घसरणीसह २४,४२६ या पातळीवर बंद झाला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप सेगमेंटचे प्रदर्शनही बेंचमार्क इंडेक्सप्रमाणेच राहिले. बीएसई स्मॉलकॅप इंडेक्समध्ये ०.२९ टक्क्यांची घसरण आणि बीएसई मिडकॅपमध्ये ०.४१ टक्क्यांची घसरण झाली.



निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक फायदा आयटीसीला झाला, ज्यात २.२१ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर भारत इलेक्ट्रॉनिक्समध्ये

**सेन्सेक्स 79,809**
**निफ्टी 24,426**

१.५३ टक्क्यांची वाढ, श्रीराम फायनान्समध्ये १.५१ टक्क्यांची वाढ, ट्रेंटमध्ये १.२० टक्क्यांची वाढ, एशियन पेंट्समध्ये १.१९ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक तोटा महिंद्रा अँड महिंद्राला झाला, ज्यात २.९१ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये २.०८ टक्क्यांची घसरण, इन्फोसिसमध्ये २.०४ टक्क्यांची घसरण, अपोलो हॉस्पिटलमध्ये १.५३ टक्क्यांची घसरण आणि अदानी एंटरप्रायझेसमध्ये १.३५ टक्क्यांची घसरण झाली. या घसरणीच्या बाजारात काही सेक्टर्सना फायदा झाला. निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.९५ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर निफ्टी मीडिया मध्ये ०.३५ टक्क्यांची वाढ आणि निफ्टी इंडिया डिफेन्समध्ये ०.१९ टक्क्यांची वाढ झाली.

सर्वाधिक तोटा निफ्टी कॅपिटल मार्केटला झाला, ज्यात १.८३ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर निफ्टी रिअल्टीमध्ये १.३३ टक्क्यांची घसरण, निफ्टी ऑइल अँड गॅसमध्ये १.०१ टक्क्यांची घसरण, निफ्टी ऑटोमध्ये ०.८८ टक्क्यांची घसरण, निफ्टी आयटीमध्ये ०.८७ टक्क्यांची घसरण, निफ्टी मेटलमध्ये ०.६० टक्क्यांची घसरण झाली.

# दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'

**दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...**



बाळकृष्ण (बळी ) पवार. यांचे बंधू अरविंद पवार. नायगांव पोलीस लाईन. यांचा लाडका बाप्पा.



कु रित्विक आणि शिवण्या कांबळे ,घाटकोपर प.



श्री परश्कृपा टावर, विरार पूर्व

# अतिरिक्त २५ टक्के टॅरिफचा प्रश्न सुटल्यानंतरच अमेरिकेसोबत व्यापार करारावरील वाटाघाटी, केंद्र सरकार आक्रमक

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

रखडलेला व्यापार करार आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या अतिरिक्त २५ टक्के टॅरिफमुळे भारत आणि अमेरिकेत तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशात वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे की, अतिरिक्त २५ टक्के टॅरिफचा प्रश्न सुटल्यानंतरच अमेरिकेसोबत व्यापार करारावरील वाटाघाटी पुन्हा सुरू होऊ शकतात.

अमेरिका व्यापार कराराच्या चर्चा सुरू ठेवण्यासाठी २५ ऑगस्ट रोजी एक पथक भारतात पाठवणार होते, परंतु राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची रशियन तेल खरेदी ही करार मोडणारी कृती असल्याचे म्हणत ही चर्चा थांबवली होती. त्यानंतर ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लावण्याची घोषणा केली होती.

या अधिकाऱ्याने सांगितले की, सरकार अमेरिकेशी संपर्क साधत आहे आणि २५ ऑगस्ट रोजी होणारी वाटाघाटीच्या चर्चेची फेरी पुढे ढकलण्यात आली आहे.

"आम्ही सध्या व्यापार करारावर वाटाघाटी करत नसलो तरी अजूनही चर्चा सुरू आहे. करारावर वाटाघाटी करताना पहिल्यांदा अतिरिक्त २५ टक्के टॅरिफचा प्रश्न सुटला पाहिजे. कारण जर आम्ही व्यापार करार केला आणि अतिरिक्त टॅरिफ कायम राहिले तर आपल्या निर्यातदारांच्या दृष्टीने याला काहीच अर्थ राहणार नाही", असे अधिकाऱ्याने सांगितले.

अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तूंचे टॅरिफ वाढल्याने निर्यातदारांना मोठा फटका बसत आहेत. अशात वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने या संकटाला तोंड देण्यासाठी उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयातील सूत्रांनी सांगितले.

२०२४-२५ मध्ये भारताने अमेरिकेला ८७ अब्ज डॉलर्सच्या वस्तूंची निर्यात केली होती. नवीन टॅरिफमुळे या निर्यातीपैकी ५५ टक्के निर्यातीवर मोठा परिणाम होईल असा अंदाज अर्थ मंत्रालयाने व्यक्त केला आहे.

ट्रम्प यांनी लादलेल्या या अतिरिक्त २५ टक्के टॅरिफमुळे, व्यापार तज्ज्ञांचा अंदाज आहे की भारताच्या अमेरिकेतील निर्यातीचे मूल्य २०२५-२६ (आर्थिक वर्ष २६) मध्ये आर्थिक वर्ष २०२५ च्या पातळीपेक्षा लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. थिंक-टँक ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हच्या विश्लेषणानुसार, भारताची अमेरिकेतील उत्पादन निर्यात आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४९.६ अब्ज डॉलर्सपर्यंत घसरू शकते, जी मागील आर्थिक वर्षात सुमारे ८७ अब्ज डॉलर्स होती. कारण भारताच्या अमेरिकेतील निर्यातीपैकी दोन तृतीयांश निर्यातीवर ५० टक्के टॅरिफ आकारला जाईल, ज्यामुळे काही उत्पादनांवरील टॅरिफ ६० टक्क्यांहून अधिक होईल.

# रिलायन्स जिओचा आयपीओ 2026 मध्ये

## मुकेश अंबानींची मोठी घोषणा

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या भागधारकांची प्रतिक्षा अखेर संपणार असून. जिओचा IPO पुढच्या वर्षी म्हणजेच २०२६ च्या पहिल्या सहामाहीत येणार आहे. याबाबत रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या ४८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत भागधारकांना संबोधित करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी यांनी ही माहिती दिली.

मुकेश अंबानी म्हणाले, "मला अभिमान आहे की जियो आपल्या आयपीओसाठी अर्ज करण्याच्या तयारीत आहे. आमचे लक्ष्य २०२६ च्या पहिल्या सहामाहीत जियोला सूचीबद्ध करणे आहे. मी तुम्हाला विश्वास देतो की, जिओ आपल्या जागतिक प्रतिस्पर्ध्यांप्रमाणेच मूल्यनिर्मिती करेल. ही गुंतवणूकदारांसाठी अत्यंत आकर्षक संधी ठरेल, याची मला खात्री आहे."

यावेळी अंबानी यंनी स्पष्ट केले की, रिलायन्स जिओने आज आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. कंपनीच्या ग्राहकसंख्येने



५० कोटींचा आकडा पार केला आहे. भागधारक आणि ग्राहकांचे आभार मानताना मुकेश अंबानी म्हणाले की, "जिओने अनेक अकल्पनीय गोष्टी केल्या आहेत. ज्यामध्ये व्हॉईस कॉल मोफत करणे, डिजिटल पेमेंटच्या पद्धती बदलणे, आधार, यूपीआय, जनधनसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सना वाव देणे आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या स्टार्टअप इकोसिस्टमचा कणा बनणे यांचा समावेश आहे."

मुकेश अंबानी पुढे म्हणाले की, "जियो ट्रू ५जी ने डिजिटल कनेक्टिव्हिटीचा वेग, विश्वासार्हता आणि नेटवर्कने इंटरनेटची नव्याने व्याख्या लिहिली आहे. मी अनेक लाकांना 'जिओने माझे जीवन बदलले' किंवा 'मला जिओ आवडते', असे म्हणताना ऐकले आहे. पण मी मनापासून सांगतो की, प्रत्यक्षात प्रत्येक भारतीयाने आपल्या जीवनाचा भाग बनवून जिओला उभे केले आहे."

या सर्वसाधारण सभेत बोलताना रिलायन्स जिओचे अध्यक्ष आकाश अंबानी यांनी सांगितले की, "५जी सुरू झाल्यापासून देशात जियोच्या ग्राहकसंख्येत झपाट्याने वाढ झाली आहे. देशातील २२ कोटींपेक्षा अधिक ग्राहक आता जियो ट्रू ५जी नेटवर्कचा वापर करत आहेत." त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, जिओ लवकरच आंतरराष्ट्रीय बाजारातही उतरणार आहे.

# सुवर्णमहोत्सवी वर्षात बालकुमार साहित्य संस्थेचे भरीव उपक्रम

**वाचाल तर वाचाल असं आपण नेहमी म्हणतो. परंतु वाचनाची सुरवात हि बालवयापासूनच व्हायला हवी. अर्थात आपल्याकडे अनेक मोठ्या साहित्यिकांनी खास मुलांसाठी विपुल प्रमाणात लेखन देखील केलेले आहे. खास मुलांसाठी साहित्य संपदा निर्माण करून वाचनाची आवड वृध्दीनगत करणाऱ्या अनेक संस्थांपैकी बालकुमार साहित्य संस्था हि एक सक्रिय अशी संस्था आहे. संस्थेचा सुवर्णमहोत्सव पूर्ण झाला असून या महिन्यात संस्था एकाव्वन व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

साप्ताहिक संवाद

१]बालकुमार साहित्य संस्थेने नुकताच सुवर्णमहोत्सव साजरा केला आहे हा प्रवास कसा होता?

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात १८७८ मध्ये पुण्यात न्यायमूर्ती रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले मराठी ग्रंथकार संमेलन भरले तर १९७६ मध्ये भा रा भागवत यांच्या अध्यक्षतेखाली पहिले अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन भरले. या अगोदर १९७५ यामध्ये मराठी साहित्य,संस्कृती,कला क्षेत्रात बालकुमार साहित्यामध्ये योगदान देण्यासाठी अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थेची स्थापना झाली. मराठी साहित्य संमेलनात बालकुमार साहित्याला दुय्यम वागणूक मिळायची यामुळेच अमरेंद्र गाडगीळ,भा रा भागवत,शामला शिरोडकर,रमेश मुधोळकर अशा मंडळींनी या साहित्य संस्थेची स्थापना पुण्यात केली. १९७६ ते २०२४ या काळात संस्थेने बालकुमार संहितायची सुमारे २७ संमेलने घेतलेली आहेत. शिवाय राज्यस्तरीय बाळ साहित्य पुरस्कार,जीवन गौरव पुरस्कार,मुलांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण करण्यासाठी कथा कविता वाचन आणि लेखन स्पर्धा,अशा प्रकारे आजवरच्या प्रवासात संस्थेने बालकुमारांच्या साहित्याचे संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२]संस्थेच्या एकूण किती शाखा आहेत?आणि त्याद्वारे कोणते उपक्रम राबविले जातात?

संपूर्ण महाराष्ट्र राज्यात संस्थेच्या एकूण २५ शाखा आहेत. शिरूर पुणे,संगमनेर,आजरा,राजापूर,संभाजीनगर,चिपळूण,अमरावती,कणकवली,बीड,पालघर,जालना अशा एकूण २५ शाखा कार्यरत आहेत. याशिवाय भविष्य काळात गुजरात,कर्नाटक,छत्तीसगढ,मध्य प्रदेश या राज्यांमधील मराठी वाचकांचे प्रेम आणि मागणी लक्षात घेता तिथेही शाखांचा विस्तार होणार आहे. शासन स्तरावर बालसाहित्याला केवळ ६ पुरस्कार देण्यात येतात. मात्र मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या माध्यमातून १९ बालकुमार साहित्याला पुरस्कार दिले जातात. शिवाय बालकांसाठी साहित्य वाचन,लेखन स्पर्धांचे आयओजन,तसेच वक्तृत्व स्पर्धा आणि विविध कलाप्रकारासाठी देखील स्पर्धांचे आयोजण केले जाते.



३]भविष्य काळात संस्थेच्या मध्यमातून कोणते उपक्रम राबविले जाणार आहेत?

बालकुमार साहित्य संस्थेने आता पन्नाशी पूर्ण करून एक्कावन्न व्या वर्षात यशश्वी पदार्पण केले आहे. भविष्य काळात संस्था अनेक नवीन उपक्रम राबविणार आहे. यामध्ये बालसाहित्यिक कोष,मुलांसाठी ज्ञानकोश,उत्तम बालसाहित्य निर्मितीसाठी मुले आणि नवोदित बालसाहित्यिकांसाठी कार्यशाळा,शालेय मुलांचे कवी संमलेन,वाचन,लेखन आणि भित्तिपत्र स्पर्धा अशा स्पर्धांचे आयोचजण देखील संस्था मोठ्या प्रमाणात करणार आहे. सुवर्णमहोत्सवी समरणिका आणि बालसाहित्य मासिक देखील सुरु केले जाणार आहे. मुलांसाठी आणि बालसाहित्यासाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांना एकत्र जोडून भरीव असे कार्य करण्याचा संस्थेचा मानस आहे.

लोकरंग

# डॉ. उर्जित पटेल यांना आयएमएफमध्ये मोठी जबाबदारी

नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) माजी गव्हर्नर डॉ. ऊर्जित पटेल यांची आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये भारताचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्र सरकारने त्यांच्या तीन वर्षांच्या कार्यकाळाला मंजुरी दिली आहे.



मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने अर्थतज्ज्ञ आणि आरबीआयचे माजी गव्हर्नर डॉ. ऊर्जित पटेल यांची आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये कार्यकारी संचालक पदावर नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा पुढील आदेशापर्यंत, यापैकी जे आधी असेल, तोपर्यंत त्यांची ही नियुक्ती असेल.

डॉ. पटेल यांनी सप्टेंबर २०१६ मध्ये रघुराम राजन यांच्यानंतर आरबीआयचे २४ वे गव्हर्नर म्हणून पदभार स्वीकारला होता. मात्र, त्यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच डिसेंबर २०१८ मध्ये त्यांनी 'वैयक्तिक कारणास्तव' आपल्या पदाचा राजीनामा दिला होता, ज्यामुळे ते चर्चेत आले होते. १९९० नंतर कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी राजीनामा देणारे ते पहिले आरबीआय गव्हर्नर ठरले होते.

आरबीआय गव्हर्नर होण्यापूर्वी त्यांनी बँकेत डेप्युटी गव्हर्नर म्हणूनही काम पाहिले होते. त्यांच्याकडे मौद्रिक धोरण, आर्थिक धोरण संशोधन, सांख्यिकी आणि माहिती व्यवस्थापन, ठेव विमा, संवाद आणि माहितीचा अधिकार यासारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या होत्या. विशेष म्हणजे, डॉ. कृष्णमूर्ती सुब्रमण्यम यांचा कार्यकाळ संपण्यास सहा महिने बाकी असताना, मे महिन्यात सरकारने त्यांना पदावरून दूर केले होते. त्यांच्या जागी आता डॉ. पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक अनुभवी चेहरा मिळाला आहे.

# पीएम मोदींना शिवीगाळ!

## तुम्ही जितक्या शिव्या द्याल, तितके कमळ फुलेल - अमित शाह

गुवाहाटी, दि. २९ वृत्तसंस्था



या वर्षाच्या अखेरीस बिहारमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप आणि काँग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या सुरू झाल्या आहेत. दरम्यान, राहुल गांधी मतदार हक्क यात्रेनिमित्त बिहारचा दौरा करत आहेत. यादरम्यारम्यान, काँग्रेसच्या मंचावरुन युथ काँग्रेसच्या स्थानिक नेत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आईवरुन शिवीगाळ केल्याची घटना घडली. यावरुन आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे.

आसामची राजधानी गुवाहाटी येथे एका सभेला संबोधित करताना अमित शाह म्हणाले की, २७ देशांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित केले आहे. असा पंतप्रधान ज्यांचा संपूर्ण जग आदर करतो, परंतु काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय राजकारणात द्वेष आणि तिरस्काराचे नकारात्मक राजकारण सुरू केले आहे. सध्या बिहारमध्ये घुसखोर बचाओ यात्रा सुरू आहे. या यात्रेतून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दिवंगत आईसाठी अपशब्द वापरण्यात आले. हे काँग्रेस नेत्यांनी केलेले सर्वात घृणास्पद कृत्य आहे.


शाह पुढे म्हणाले की, राहुल गांधींनी या मंचावरुन द्वेषाचे राजकारण सुरू केले आहे. पंतप्रधान मोदींच्या दिवंगत आईबद्दल वापरल्या जाणाऱ्या अपशब्दांचा मी मनापासून निषेध करतो आणि मी संपूर्ण देशातील जनतेला सांगू इच्छितो की, राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या निरर्थक, नकारात्मक आणि द्वेषपूर्ण राजकारणामुळे आपले सार्वजनिक जीवन उंचावणार नाही तर ते खोलवर जाईल.

# निसर्गरम्य केरळची सफर

केरळ हे जगातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक आहे, जे नयनरम्य सौंदर्य, हिल स्टेशन्स, बॅकवॉटर आणि तोंडाला पाणी आणणाऱ्या पाककृतीसाठी प्रसिद्ध आहे.भारताच्या दक्षिण-पश्चिम टोकावरील देवाचा स्वतःचा देश म्हणून ओळखले जाणारे केरळ हे जगातील सर्वाधिक मागणी असलेल्या पर्यटन स्थळांपैकी एक आहे. नॅशनल जिओग्राफिक ट्रॅव्हलरच्या मते, केरळ हे आयुष्यभरात अत्यंत आवश्यक

चला पर्यटनाला

असलेल्या ५० स्थळांपैकी एक आहे. समतोल हवामान, निर्मळ समुद्रकिनारे, शांत बॅकवॉटर, हिरवीगार हिल स्टेशन्स, आयुर्वेदिक उपचार केंद्रे आणि वन्यजीव यामुळे ते एक लोकप्रिय पर्यटन स्थळ बनले आहे.थेक्कडी हे वन्यजीव आणि निसर्ग प्रेमींसाठी स्वर्ग आहे आणि केरळमधील थंड हवामान, हिरवळ, वन्यजीव अभयारण्य आणि चहा, कॉफी आणि सुगंधी मसाल्यांच्या लागवडीसह टेकड्यांमुळे केरळमधील सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहे. पेरियार वन्यजीव अभयारण्य ७७७ चौ.कि. मी.मध्ये पसरलेले आहे आणि थेक्कडी




मधील हे एक आवश्यक ठिकाण आहे. ७७७ चौरस किलोमीटरपैकी ३६० चौरस किलोमीटर घनदाट सदाहरित जंगल आहे. पेरियार वन हे एक राखीव वन्यजीव आहे जेथे बोटीच्या सुरक्षिततेतून वन्यजीवांचे निरीक्षण करता येते. तलावात खेळणारे हत्ती आणि आजूबाजूला घुटमळणारे वाघ हे पाहण्यासारखे दृश्य आहे. हत्तींव्यतिरिक्त, सिंहाच्या शेपटीचे मकाक, सांबर हरण, बिबट्या आणि रानडुक्कर देखील दिसतात. पंबा आणि पेरियार नद्या घनदाट उद्यानातून वाहतात आणि वनस्पती आणि जीवजंतूंच्या वाढीस मदत करतात. मलबार ग्रे हॉर्नबिल, पांढऱ्या पोटाचा निळा फ्लायकॅचर, सनबर्ड, ग्रेट हॉर्नबिल, काळ्या मानेचा करकोचा आणि निलगिरी वुड कबूतर यांसारख्या अनेक स्थलांतरित पक्ष्यांनाही ते आश्रय देते. ट्री हाऊस रिसॉर्टमध्ये राहून तुम्ही वन्यजीव आणि हिरवाईचा आनंद घेऊ शकता.

# आर्थिक वर्ष 2024-25 साठी नेक्स्ट्राचा सस्टेनेबिलिटी अहवाल प्रसिद्ध

नोंद

नेक्स्ट्रा डेटा लिमिटेड (नेक्स्ट्रा बाय एयरटेल) ने वित्त वर्ष 2024-25 चा सस्टेनेबिलिटी अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालामध्ये कंपनीनं स्मार्ट, मोठ्या प्रमाणात वापरता येईल अशी आणि टिकाऊ डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याबाबत झालेली प्रगती सांगितली आहे.हा अहवाल शाश्वतेच्या तीन स्तंभांमध्ये नेक्स्ट्राची वचनबद्धता आणि प्रगती अधोरेखित करतो स्वच्छ ऊर्जा आणि स्मार्ट ऑपरेशन्सद्वारे पर्यावरणीय प्रभाव कमी करणे, सामाजिक समावेश आणि सुरक्षितता वाढवणे आणि पारदर्शकता आणि जबाबदारीसह प्रशासनाला बळकटी देणे. सीईओ, ॲशिष अरोरा यांनी सांगितले:नेक्स्ट्रा मध्ये सस्टेनेबिलिटी हा आमच्या प्रत्येक कामाचा केंद्रबिंदू आहे. मग तो डिझाईन असो, कन्स्ट्रक्शन असो किंवा ऑपरेशन्स. या वर्षी आम्ही इंडस्ट्रीसाठी नवे बेंचमार्क तयार केले आहेत. आम्ही देशातले पहिले डेटा सेंटर आणि फक्त 14वी कंपनी आहोत ज्यांनी RE100 जागतिक उपक्रमात प्रवेश केला आणि 100% पुनर्नवीनीकरणीय उर्जेचा वापर करण्याची वचनबद्धता दिली. तसेच आम्ही देशातले पहिले आहोत ज्यांनी AI चा मोठ्या प्रमाणावर वापर करून उर्जा कार्यक्षमता वाढवली आणि कार्यप्रदर्शन सुधारले." 2024-25 मधली महत्वाच्या कामगिरीमध्ये कंपनीने तब्बल 482,800 MWh पुनर्नवीनीकरणीय ऊर्जा कराराद्वारे घेतली असून 2021 च्या आधारभूत वर्षाच्या तुलनेत 3x जास्त आहे. आधारभूत म्हणून आर्थिक वर्ष 2021 च्या तुलनेत सरासरी वीज वापर परिणामकारकता (PUE) 10% ने कमी केली आहे. 85/100 चा कर्मचारी प्रतिबद्धता गुण मिळवून कामाच्या ठिकाणी विश्वास वाढवला असून 99% पुरवठादार भारतातलेच ठेवले त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत केली आणि लवचिक पुरवठा साखळी वाढवलीधोरणात्मक पुरवठादारांच्या 98% साठी ईएसजी मूल्यांकन आयोजित करून संपूर्ण मूल्य साखळीमध्ये शाश्वतता सुनिश्चित केला आहे.




संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# कांद्याची माळ अजित पवारांकडे फेकण्याचा प्रयत्न; दोघे पोलिसांच्या ताब्यात

अहिल्यानगर, दि. २९ प्रतिनिधी

जिल्ह्यातील संगमनेर येथे काल रात्री शिवसेना आमदार अमोल खताळ यांच्या कानशिलात लगावल्याने वातावरण तणावग्रस्त झाले होते. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत तेथील परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र, आज श्रीगोंदा येथे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या दिशेने कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी, पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं असून ते संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे तत्कालीन युवक अध्यक्ष सूरज चव्हाण यांच्याकडून लातूरमध्ये संभाजी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षांना मारहाण करण्यात आली होती. त्यामुळे, संभाजी ब्रिगेडचे समर्थक अजित पवारांच्या राष्ट्रवादीवर संतापले आहेत.

श्रीगोंदा येथे शेतकरी मेळाव्यात बोलतांना अजित पवारांना कांद्यावर बोलण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र,अजित पवारांचे भाषण सुरू असताना काही कार्यकर्ते हातात कांद्याची माळ घेऊन आले होते. त्यावेळी, एका कार्यकर्त्याने हातातील माळ गरागरा फिरवत अजित पवारांकडे फेकण्याचा प्रयत्न केला. मात्र, वेळीच तेथील एकाने संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यास रोखले. त्यानंतर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे आणि तालुका अध्यक्ष नाना शिंदे यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. संभाजी ब्रिगेडच्या समर्थकांकडून कांद्याचे दरासंदर्भात अजित पवारांना बोलण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, कांद्यासंदर्भात अजित पवारांनी आपल्या भाषणात शब्दही न बोलल्याने भाषणाच्या शेवटी अजित पवारांकडे कांद्याची माळ फेकण्याचा प्रयत्न केला गेला. दरम्यान, कांद्याचे दर घसरल्याने शेतकऱ्यांचे व कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे, कांद्याच्या दरावर सरकारने काहीतरी मार्ग काढावा, अशी भूमिका संभाजी ब्रिगेडने घेतली आहे.

# राहुल गांधींना बदनाम करण्यासाठी भाजप कोणत्याही थराला जाईल - राऊत

मुंबई, दि. २९ प्रतिनिधी

बिहारमध्ये काँग्रेसच्या 'मतदार हक्क यात्रे' दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आईच्या नावाने शिवीगाळ केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यावरुन सध्या राजकारण तापले असून, भाजप सातत्याने राहुल गांधींवर टीका करत आहेत. अशातच, शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी या मुद्द्यावर भाजपला कोंडीत पकडले आहे. 'राहुल गांधी यांना बदनाम करण्यासाठी भाजप कोणत्याही थराला जाऊ शकते,' असे राऊत म्हणाले.



मीडियाशी संवाद साधताना संजय राऊत यांना विचारण्यात आले की, 'मतदार हक्क यात्रे'तून पंतप्रधान मोदींना बदनाम केले जात आहे का? यावर राऊत म्हणाले, "कोण शिवीगाळ करत आहे? काही कार्यकर्ते शिवीगाळ करत असतील. पण, भाजपनेच त्यांचे लोक सभेत सोडले असतील. चांगल्या कामाची बदनामी करण्यासाठी, मतदार हक्क यात्रेची आणि राहुल गांधींना बदनाम करण्यासाठी भाजपचे लोक कोणत्याही थराला जाऊ शकतात. महाराष्ट्रात आम्हाला अनुभव आहे. शिवी देणारे त्यांचेच लोक असले पाहिजेत,' अशी बोचरी टीका राऊत यांनी केली.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219